3 March 2009
2009

ॐ श्री परमात्मने नमः ॥

- सांख्ययोग -

अध्याय २ रा

१ ल्या अध्यायाची पार्श्वभूमी, अर्जुनाची भूमिका
अर्जुनाला झालेला विषाद- हातातील शस्त्र खाली ठेवून रथाच्या मागील भागात जाऊन बसला. या अध्यायात भगवंताचे एकही वाक्य नाही. कारण अर्जुन स्वतःच्या मताशी ठाम होता. काही ऐकून घेण्याची त्याची तयारी नव्हती.

परंतु दुसऱ्या अध्यायात त्याचा दृष्टीकोन थोडासा बदललेला दिसून येतो. तो स्वतः शिष्यत्व पत्करून मला उपदेश करा असे म्हणतो. तेव्हा भगवंत त्याला समजावून सांगत आहेत. ह्या अध्यायाचे नाव 'सांख्ययोग' असे आहे. सांख्य म्हणजे ज्ञानयुक्त बुद्धी! म्हणजे हा सांख्ययोग एका अर्थी बुद्धीयोगच आहे. स्वकर्म आचरण्यासाठी निश्चयात्मक बुद्धी लागते. आत्मतत्व जाणण्यासाठी ज्ञानयुक्त बुद्धी लागते आणि कर्मयोग आचरण्यासाठी बुद्धियुक्त ज्ञान लागते. अशी सांख्यबुद्धी अर्जुनाची व्हावी म्हणून भगवंतांनी सांख्ययोग सांगितला.

असा हा सांख्ययोग म्हणजे अद्वैताचे प्रतिपादन करणारा ज्ञानयोग आहे. पण सांख्यदर्शन हे याहून भिन्न आहे. सांख्यदर्शनाची रचना द्वंद्वात्मक आहे त्यात प्रकृती आणि पुरुषाचे द्वंद्व आहे. पुरुष चेतन तर प्रकृती अचेतन आहे. त्या दोहोंच्या संयोगाने ही सगळी सृष्टी निर्माण होते असे सांख्यदर्शन सांगते.

अद्वैत तत्त्वज्ञान - चेतनातूनच अचेतनाची निर्मिती होते.

© www.madhuraveeraghuveer.com

म्हणजे देहातूनच केस न नखे वाढतात ती कापली तरी चेतन देहाला वेदना होत नाहीत.

सांख्य म्हणजे शिकवण

सांख्य म्हणजे एका-मनाने

हा दुसरा अध्याय सांख्ययोग म्हणजे गीतेची अनुक्रमणिकाच आहे. म्हणजे पुढे कोणकोणते विषय गीतेत येणार आहेत. त्या सर्वांचा अभ्यास स्पर्श या अध्यायात केला आहे.

युक्त आसीत मत्परः - भक्तियोग

यततो. म्हणजे प्रयत्न करणारा - कर्मयोग

विपश्चित: - बुद्धिमान - ज्ञानयोग

म्हणजे भक्तियोग, कर्मयोग आणि ज्ञानयोग या तिन्ही योगांचा मिलाफ या सांख्ययोगात आलेला आहे. सुख-दुःख, जय-पराजय, मान-अपमान ही द्वंद्वे निर्लेपपणे सहन करणे याला म्हणायचे 'कर्मयोग'. द्वारांच्या अतीत असलेल्या अक्षरामध्ये लीन होण्याचा प्रयत्न म्हणजे 'ज्ञानयोग' आणि अक्षराच्याही पलीकडे जो पुरुषोत्तम आहे त्याला अनन्यभावाने शरणागत व्हायचे हा आला ज्ञानोत्तर 'भक्तियोग'.

असा हा कर्म-ज्ञान-भक्ति या तिन्हींचा त्रिवेणी संगम. एकाशिवाय दुसरे अपूर्ण आहे.

गृहिणीला स्वयंपाकातील पदार्थांचे प्रमाण त्याचा क्रम कृती याचे ज्ञान आवश्यक आहे. त्या ज्ञानानुसार त्याची कृती करणे आवश्यक आहे आणि या सर्व पाककलेच्या मागे कुटुंबीयांचे आरोग्य त्यांची रुचीनुरूप

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

2009

February
Thursday
Week 06
036-329
05

होतो असा मान. जसे प्रेम त्या सर्व स्वयंपाकाच्या मागे असावे लागते. तो स्वयंपाक रुचकर होतो. व त्यामुळे इतरांचा अंतरात्मा तृप्त होतो. हीच गोष्ट डॉक्टरांच्या बाबतीत खरी आहे. ज्ञान-कृती-विश्वास या त्रयींमुळेच रुग्णाला गुण येतो

या सांख्ययोगामध्ये तीन गोष्टी प्रामुख्याने प्रतिपादन केलेल्या आहेत. १) स्वधर्माचरण २) आत्म्याचे अमरत्व ३) फलत्याग

१ ला श्लोक - संजयचे निवेदन
२,३ श्लोक - अर्जुनाची कडक शब्दात निर्भर्त्सना
४ ते ८ श्लोक - अर्जुनाची बदललेली भूमिका हरिशरणता
९,१० श्लोक - संजय
११ ते ३० सांख्ययोग
३१ ते ३८ - क्षात्रधर्म
३९ ते ५३ निष्काम कर्मयोग
५४ ते ७२ - स्थितप्रज्ञाचे वर्णन

१ल्या अध्यायात अर्जुनाच्या युद्धाला पूर्ण विरोध होता. तेव्हा ज्ञानग्रहणाला आवश्यक मनोभूमिका तयार झालेली नव्हती. थोडक्यात जमीन नांगरलेली नसताना ती पेरणे जसे चुकीचे तसेच ऐकण्याची इच्छा नसणाऱ्या शिष्याला उपदेश करणे व्यर्थ होय. ज्ञानाची तहान लागणे ही 'शिष्याची पात्रता'. अर्जुनाला कळत होते कि ना नाही असा निर्णय नक्की आहे. त्यामागची भूमिका आता जाणून घ्यायची आहे.

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

सद्गुरु आणि सत्‌शिष्य यांची जोडी-
जडामागील आत्मतत्त्व हे चैतन्यरूप आहे असा 'नित्यानित्यविवेक' जागविण्यासाठी भगवंतांनी हा सांख्ययोग अर्जुनाला विशद केला.

अर्जुनाचे कर्म निष्काम, ईश्वरार्पण आणि धर्मरक्षणार्थ व्हावे म्हणून भगवंतांनी त्याच्या कर्माला ज्ञानाचे डोळे दिले. आंधळा आणि पांगळा यांचे उदाहरण.

गीता ही स्वधर्माचरण करायला शिकवते. येथे कोठेही विरोधाभास नाही. गीता कोणत्याही वादात पडत नाही. गीतेमध्ये कशाचेही खंडन नाही. मंडन मात्र निश्चित आहे.

(2) मधुसूदन: ज्ञानाचे हे मुख्य वाक्य आहे.
मधुसूदन - म्हणजे मधु नावाच्या दैत्याला ठार मारणारा, तो मधुसूदन म्हणजेच श्रीकृष्ण भगवान! तो त्याला म्हणाला. त्याला म्हणजे अर्जुनाला! पुढे त्या अर्जुनाची सर्व विशेषणे आहेत. "कृपयाविष्टम्'— कृपा आणि दया यामध्ये फरक आहे. कृपेमध्ये माझे माझे ही ममतेपोटी असणारा स्नेहविशेष असतो तर दया म्हणजे यत्नपूर्वक दुसऱ्यांच्या क्लेशांचे हरण करण्याची इच्छा असते. कृपेत ममता असते दयेत वैश्विक भाव असतो. 'अश्रुपूर्णाकुलेक्षणम्' - अश्रूंनी डोळे भरल्यामुळे स्पष्ट पाहू शकत नाही असा आणि विषीदन्तम्' म्हणजे खिन्न / असा अर्जुन

© www.madhaveeraghuveer.com

संजयाचे बोलणे ऐकून कळवळला नाही.

श्री भगवान् उवाच।

या ठिकाणी भगवान हे योगेश्वर श्रीकृष्णाचे नाव आहे. भगवान म्हणजे भग असलेला! आता भग म्हणजे काय? तर

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसःश्रियः।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा॥

म्हणजे ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य या सहा गुणांच्या समूहाला भग असे म्हणतात आणि हे सहा गुण ज्यांच्याकडे आहेत ते भगवान्!

त्याचप्रमाणे अर्जुन हा मुमुक्षु होता. मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा करणारा. अशा व्यक्तीच्या ठायी आठ सद्गुण असतात असे गौतम ऋषी म्हणतात.

१) दया - सर्वांवर प्रीति
२) क्षान्ति - सहनशीलता
३) अनसूय - दुसऱ्याचा हेवा न करणे.
४) शौच - मन, कर्म आणि वाणी यांची शुद्धता.
५) अनायास - हव्यास न बाळगता संतुष्ट
६) मांगल्य - संतोषजन्य आनंद
७) अकार्पण्य - कृपणतेचा अभाव

Sunday 08

८) अस्पृहा - कोणत्याही गोष्टीची लालसा नसणे.

(२) कश्मलम् अज्ञान, विषमे - कठीण प्रसंगी अनार्यजुष्टम् - (आर्य म्हणजे श्रेष्ठ पुरुष) आर्यांना न शोभेल असे वर्तन, अस्वर्ग्यम् - अशा वागण्याने स्वर्गाची प्राप्ती होणार नाही. अकीर्तिकरम् - अशा वागण्याने कीर्तिमध्येसुद्धा भर पडणार नाही.

© www.madhaveeragnuveer.com

| January | | | | | | February | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 | Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 | Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 | Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 | Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | | Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

③ भगवान अर्जुनाला फटकारतात. सर्वात वाईट शब्द क्लैब्य वापरलेला आहे. हा अधैर्याने दुबळेपणा उद्देशून वापरला आहे. नामर्दपणा किंवा षंढपणा. परंतु लगेचच त्याच्या पराक्रमाची आठवण देण्यासाठी परंतप आणि पार्थ अशी दोन संबोधने वापरली आहेत. परंतप म्हणजे महान तपस्वी किंवा शत्रूला त्रास देणारा आणि पार्थ म्हणजे कुंतीचा (पृथा) मुलगा. कृष्णाचे लाडके संबोधन पार्थ, कौन्तेय. संपूर्ण गीतेत ३० वेळा पार्थ आणि २५ वेळा कौन्तेय हे संबोधन आले आहे.

हृदयाचे खरे सामर्थ्य विवेकात असते. विवेक नसला की दौर्बल्य निर्माण होते.

युद्धापूर्वीचा कुंतीचा निरोप

एतद् धनंजयो वाच्यो नित्योद्युक्तो वृकोदरः।
यदर्थं क्षत्रिया सूते तस्य कालोऽयमागतः॥

ज्या कारणासाठी क्षत्रिय स्त्री मुलाला जन्म देते ते कार्य करण्याचा काळ आता आला आहे असे नेहमी उद्युक्त असणाऱ्या भीमाला आणि अर्जुनाला सांगावे.

वैराग्याला नेहमी विवेकाची जोड हवी. विवेकाशिवाय वैराग्य हे केवळ आंधळे आणि अनाधिकारी असते. वैराग्याचे ५ प्रकार आहेत. १) त्रासवैराग्य २) स्मशानवैराग्य ३) प्रसूतिवैराग्य ४) मैथुनवैराग्य ५) शुद्धवैराग्य

वरील दोन श्लोकांमध्ये भगवंतांनी कडक शब्दात अर्जुनाची निर्भत्सना केली आहे. पण तरीही अर्जुन म्हणतो -

© www.madhaveeraghuveer.com

(४) पूजनीय अशा भीष्म, द्रोणांबरोबर मी बाणांनी कसा लढू? खरं तर गुरुजनांच्या केवळ शब्दांनी अपमान करणे देखील एक प्रकारची हिंसाच आहे. आणि मी बाणांनी लढू? शक्यच नाही.

परंतु ते जरी गुरुजन असले तरीदेखील आता आडमार्गाने चालले आहेत. तेव्हा त्यांचा वध करण्यात काहीच दोष नाही असे भगवंत कदाचित म्हणतील असे अर्जुनाला वाटले म्हणून तो लगेच म्हणतो.

(५) परमपूज्य गुरुंना न मारता भिक्षान्न खाऊनही रहाणे योग्य ठरेल. कारण त्यांना मारून रक्तलांछित भोग भोगायचे ना?

इथे क्षत्रियासाठी भिक्षा मागणे हे निषिद्ध कर्म आहे हे तो जाणतो आणि गुरुजनांचा वध करणे हेही चुकीचे आहे अशी त्याची धारणा आहे. परंतु दोन्हींपैकी एकाच कर्माची निवड करायची झाल्यास भिक्षा मागणे (चुकीचे असले तरी) मी पत्करेन. असा युक्तिवाद तो करत आहे.

युद्ध दोन प्रकारचे असते. १) वृत्तिफलक म्हणजे राज्य, संपत्ती, स्त्री यांच्या लाभासाठी केलेले (उदा. ब्रिटिश, मुगल) २) धर्मफलक - न्याय, सत्य, धर्मासाठी केलेले (पांडव, शिवाजी महाराज)

स्वतः श्रीकृष्णाने कंसाचा (मामा) व शिशुपालाचा (आतेभाऊ) यांचा वध केला होता. जे धर्माच्या, तत्त्वाच्या आड आले त्यांना निर्ममपणे बाजूला काढावेच लागते. या न्यायाने भगवंत क्षत्रिय धर्माचे आचरण करण्याचा आदेश देतील या भीतीने अर्जुन पुढे म्हणतो -

© www.madhuveer.com

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

9.00 (६) कतरन् - करणे, नः-आम्हाला
गरीयः - श्रेष्ठ, योग्य
10.00 आम्हाला काय करणे योग्य आहे हेही ठाऊक
नाही. आम्ही जिंकू किंवा ते आम्हाला जिंकतील
11.00 हे ही आम्हाला माहीत नाही. पण ज्यांना मारून
आम्हाला जगावेसेही वाटणार नाही तेच आमच्या
12.00 समोर उभे ठाकले आहेत.
भीष्म, द्रोणांना अर्जुन 'महानुभाव' म्हणतो.
1.00 'श्रुती, अध्ययन, तप, सदाचार इ० श्रेष्ठ सद्गुण
धारण करणाऱ्याला 'महानुभाव' म्हणतात.
2.00 त्यांना मारण्यापेक्षा भिक्षा मागावी. परंतु तेही
नरकमूलक ठरेल. या बाबतीत अर्जुनाचा काही
3.00 निर्णय होत नाही. असे जेव्हा होते तेव्हा
सद्गुरूला वाट पुसावी, हेच श्रेयस्कर!
4.00 अर्जुनाने नेमके हेच केले. तो भगवंताला शरण
जातो आणि म्हणतो -
5.00 (७) करुणाव्याप्त दैन्यामुळे स्वभावनष्ट झालेला व
धर्माविषयी मूढचित्त झालेला असा मी तुम्हाला
6.00 विचारतो आहे. जे निश्चित कल्याणकारक
साधन असेल ते मला सांगा. मी आपला शिष्य
7.00 आहे, तेव्हा शरण आलेल्या मला उपदेश करावा.
अर्जुनाने श्रेय च मागितले. हा भाव अतिशय
8.00 महत्त्वाचा आहे. तो सत्शिष्य आहे. प्रामाणिक
शिष्याला गुरु भरभरून देतो. त्याने प्रेयस
मागितले नाही. इहलोकी जे जे आहे ते हवेसे वाटणे

म्हणजे 'श्रेयस' आणि कल्याणाचे कार्य हातून घडावे, परमार्थाचा प्रत्यक्ष प्रत्यय यावा हे मागणे म्हणजे 'श्रेयस' श्रेयस - धर्म, मोक्ष प्रेयस - अर्थ काम म्हणून चार पुरुषार्थांमध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष' असे म्हणतात. अर्थ आणि काम वाईट नाहीत. परंतु धर्माधिष्ठित अर्थ, काम सेवन करा म्हणजे मोक्ष नक्की मिळेल असे व्यास, वाल्मीकी, कालिदासानेही सांगितले आहे. प्रेयस हे त्रिविध दुःखांनी मिश्रित असते. क्षणभंगुर असते. पण श्रेयस हे परम एकरस असे सुख असते. व्यायाम, आरोग्य - सुरुवातीला कंटाळवाणे नंतर फलदायी असते. त्यासाठी सद्गुरु हवा.

इहलोक जाणाया कारणे। जाणत्याची संगती धरणे।
परलोक साधाया कारणे। सद्गुरु पाहिजे॥

सद्गुरु आपल्याला एकात्मज्ञान देतो. गुरुला शिष्याची चिंता असते. तो शिष्याला बरोबर स्वरूपाकडे घेऊन जातो [शेळी आणि सिंह]
अर्जुन शास्त्रज्ञानसंपन्न आणि शुद्धबुद्धी आहे. तो म्हणतो -

(८) इंद्रियांना सुकवणारा हा शोक दूर करू शकेल असे काहीही मला दिसत नाही. पृथ्वीचे निष्कंटक व धनधान्यसमृद्ध राज्य मिळाले किंवा देवांचे स्वामित्व जरी मिळाले तरी ते नको.

श्रीमंती म्हणजे खरे सुख नव्हे. पराविद्या हेच खरे सुख. खरे शाश्वत सुख व मनःशांती आत्मविद्येने मिळते. आत्मज्ञानी केवळ आत्मरूपच पहातो.

इंद्रियांचे विविध विषय असतात. तोच त्यांचा आहार होय. आहारशुद्धी झाली की अंतःकरण शुद्ध होते. यामुळे निश्चल स्मृती प्राप्त होते. त्यामुळे संशय, विपर्यय, अहंकार, ममत्व इत्यादि हृदयग्रंथी तुटतात.

(९) गो म्हणजे वेद (१) त्यांचे जे प्रवर्तक त्यांना गोविंद म्हणतात (२) गो म्हणजे पृथ्वी आणि विन्द म्हणजे मिळवणारा, हस्तगत करणारा तो गोविंद (३) गो म्हणजे इंद्रिये त्यांना वठणीवर आणणारा तो गोविंद। 'ह' हा शब्द आश्चर्याचा बोधक आहे. दुसरा अर्थ स्पष्टपणे असा आहे.

प्रहसन् - भगवंत थोडेसेच हसले. या युद्धाचे, स्वजनांना मारण्याचे, कुलक्षयाचे कर्तृत्व व भोक्तृत्व अर्जुन स्वतःकडे घेऊ पहात होता हे पाहून भगवंत हसले. हे हसणे 'कृपामूलक' होते. आईचे बोलणे जसे हितकारकच असते तशी गीतेची वचने आहेत. अंतर्यामी बोधपर आहेत. आत्मज्ञाननिष्ठ झाल्यावाचून शोक मोहाची निवृत्ती होत नाही. कर्मांच्या अहंकारावाचून मुक्त तत्त्वज्ञान असेल तरच मोक्षप्राप्ती होते.

तूष्णीं - गप्प झाला.

(१०) हृषीकेश - इंद्रियांचा स्वामी.

येथे भरत हे धृतराष्ट्राला उद्देशून म्हटले आहे.

हे भरतवंशी धृतराष्ट्र महाराज! अंतर्यामी भगवान श्रीकृष्ण दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी शोक करणाऱ्या अर्जुनाला हसल्यासारखे करून असे म्हणाले.

© www.madhavveeraghuveer.com

(११) अर्जुनाच्या अज्ञानाची भगवंतांना करुणा आली आणि भगवंतांनी निरूपणाला प्रारंभ केला. इथून खऱ्या अर्थाने गीतेला सुरुवात झाली. भगवंतांचे बोलणे हे कठोर परंतु हितावह आहे.

विभूतिमध्ये अक्षरातील 'अ'कार मी आहे असे म्हटले आहे. श्रोत्याचे नावही 'अ'पासून (अर्जुन) आहे आणि मुख्य निरूपणाचा प्रारंभ 'अ'पासूनच आहे.

ज्या गोष्टींचा शोक करु नयेस अशा गोष्टींबद्दल तू शोक करतोस आणि पुन्हा प्रज्ञावंताप्रमाणे बोलतोस हे किती परस्परविरोधी आहे. ज्याची बुद्धी एका लक्ष्यावर स्थिर होते तिथे प्रज्ञेचा जन्म होतो. इथे भगवंत गतासु आणि अगतासु असे दोन शब्द वापरतात. जे गेलेले आहेत आणि जे गेलेले नाहीत त्यांच्याबद्दल पंडित शोक करत नाहीत.

गतं न शोच्यम् - असे कालिदासाने म्हटले आहे. पंडा बुद्धी - बुद्धीचे अनेक प्रकार आहेत. त्यातील आत्मविषयक बुद्धी ती पंडा बुद्धी सत्-असत्, व्यष्टि-समष्टि, पिंड-ब्रह्मांड हे विवेकपूर्ण रीतीने जाणून घेणे म्हणजे पंडा बुद्धी आणि अशी पंडा बुद्धी ज्याच्याजवळ असते तो पंडित होय.



ज्याच्याविषयी शोक करु नये त्याचा शोक केला आणि वर प्रज्ञावंताप्रमाणे बोलत आहे असा दुहेरी प्रमाद अर्जुनाने केला म्हणून त्याला समजावून सांगण्यासाठी भगवंत उपदेश करतात. २८ ते 30 आणि ३१ ते ३८

(१२) जसे वाऱ्याने पाणी हलले तर त्याला तरंगाचे रूप

9.00 येते पण तो तरंग पुन्हा पाण्यातच मिसळतो.
तसेच परब्रह्मातून निर्माण झालेले विश्व पुन्हा
10.00 परब्रह्मातच विलीन होते. इथे वयम् सर्वनामाचा
उपयोग केला आहे. तत्त्वदृष्ट्या जरी आत्मा एकच
11.00 असला तरी उपाधिकृत विविध देहभेदास्तव 'आम्ही'
चा प्रयोग केला आहे.
12.00 हे उपजे आणि नाशे । जे मायावशे दिसे ।
येऱ्हवी तत्त्वता वस्तु जे असे । ते अविनाशी ॥
1.00 तरंग उठतो तेव्हा कोणाला व कुठे जन्म आला
असे म्हणता येईल. तरंग नाहीसा झाला म्हणजे
2.00 कशाचा नाश झाला? आत्मा एकमेव, नित्य
आनंदमय आहे म्हणून अर्जुनाचा शोक व्यर्थ आहे.
3.00 (१३) जीवात्म्याला वेगवेगळ्या अवस्था प्राप्त होतात.
अन्य शरीर प्राप्त होते, त्याबद्दल धीर पुरुष
4.00 मोहित होत नाहीत. परंतु हे सर्व माहीत असूनही
माणसाची देहासक्ती सुटत नाही.
5.00 अहनि अहनि भूतानि गच्छन्तीह यमालयम् ।
शेषाः स्थावरमिच्छन्ति किमाश्चर्यमतः परम् ॥
6.00 जो जन्माला आला तो मृत्यु पावणारच. जीव
गर्भावस्थेत असेपर्यंत त्याला पूर्वजन्माचे ज्ञान असते.
7.00 जन्मानंतर विस्मृती होते.
तात्पर्य - आत्मा नित्य आहे. त्याने अनंत
8.00 शरीरे धारण केलेली आहेत. आत्मज्ञानाने मोक्ष
मिळेपर्यंत तो जन्ममरणाच्या फेऱ्यातच राहणार आहे.
(१४) मात्रा म्हणजे इंद्रिये आणि त्यांचा विषयांशी
संयोग म्हणजे मात्रास्पर्श

©www.mazhaveeraghuveer.com

श्लोकभावा -

रूप, रस, स्पर्श, शब्द, गंध कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल असतात. पण सुख-दुःख, शीत-उष्ण द्वंद्वे सोसावीच लागतात.

कुंतीचे लोकाविलक्षण मागणे - दुःखामुळे सतत भगवंताचे स्मरण रहाते. सुखदुःखाचे चक्र अखंड आहे

सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ।
न नित्यं लभते दुःखं न नित्यं लभते सुखम् ॥

संकटे ही दुःखदायक न समजता आपली प्रगती करण्याची उत्तम संधी आहे असे समजावे. आणि आत्मोन्नती केवळ मानवी जन्मातच शक्य आहे. शंकराचार्य त्यांच्या विवेकचूडामणी ग्रंथात म्हणतात.

दुर्लभं त्रयमेवैतत् दैवानुग्रहहेतुकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ॥

त्यासाठी नित्यानित्यविवेक असायला हवा. मुमुक्षुता थोड्या प्रमाणात जरी असली तरी सद्गुरूंच्या प्रसादाने सत्संगाने ती तीव्र होऊ शकते ~~[illegible]~~ वैराग्य आणि मुमुक्षुत्व तीव्र होत जाते. दुःखाचे मनापासून स्वागत करायला हवे.

सहनं सर्वदुःखानां अप्रतिकारपूर्वकम् ।
चिन्ताविलापरहितं सा तितिक्षा निगद्यते ॥

इथे अर्जुनाला कौन्तेय आणि भारत अशी संबोधने वापरली आहेत.

भा म्हणजे ब्रह्मविद्या - तस्यां रमते सः म्हणजेच ब्रह्मविद्येचा अधिकारी किंवा यात रमणारा तो भारत

© www.madhuveer.com

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

(१५) अशी द्वंद्वे सहन करण्यामुळे कोणता पारमार्थिक लाभ होतो ते भगवंत सांगतात
द्वंद्वे सहन करणाऱ्या धीर पुरुषाला हे इंद्रियांचे विषय व्याकुळ करू शकत नाहीत. असा पुरुष मोक्षाला योग्य ठरतो.
इथे पुरुष + ऋषभ म्हणजे सर्व पुरुषांत श्रेष्ठ.

(१६) सत शाश्वत आहे आणि असत् अशाश्वत आहे. असत वस्तुला अस्तित्व असत नाही आणि सत वस्तुला अभाव असत नाही. या दोन्हीचेही तत्त्व ज्ञानी पुरुषांनी जाणले आहे. ह्या देहादि प्रपंचामध्ये सर्वत्र चैतन्य गुप्तपणे भरून राहिले आहे. तत्त्व जाणणारे संत ते जाणून त्याचेच ग्रहण करतात
दूध - पाणी, सोने - हीण, धान्य - भूस
केवळ द्रष्टा खरा, दृश्य प्रपंच नव्हे.
सत् हे एकसंध असते. गीतेने सत् ला पुरुष, अक्षर म्हटले आहे. तर असत्‌ला अपरा प्रकृति क्षेत्र, क्षर असे म्हटले आहे.

(१७) सत ने सर्व विश्व व्यापले आहे तो अविनाशी आहे. आत्मा हा निरवयव असल्यामुळे तो नाश पावत नाही. सर्वत्र सर्वकाळ त्याचीच सत्ता असल्याने दुसऱ्याकडून त्याला नाश होत नाही. तो एकमेव अद्वितीय आहे. तोच सर्वत्र असल्याने त्याला वेगळा आश्रय नाही. तो निर्विकार असल्याने दुसऱ्याशी त्याचा संबंधच होऊ शकत नाही. आत्मा अनादि असल्यामुळे त्याला कारण नाही. कारण नसल्याने

कार्यही नाही. चैतन्यस्वरूप आत्मा अविनाशी तर आहेच पण ज्ञानस्वरूपही आहे.

(६८) अनाशिन: - ज्याच्यात परिवर्तन होत नाही, ज्याचा नाश होत नाही, ज्याची क्षती होत नाही ज्याचा अभाव असत नाही. अप्रमेय - जो प्रमाणांचा विषय नाही, ज्याला कोणतेही मोजमाप लागू होत नाही. जे अंतःकरणाचा आणि इंद्रियांचा विषय नाही. जे अप्रमेय असते तेथे शास्त्र आणि संतांवर किंवा ग्रंथांवर श्रद्धा ठेवावी लागते. म्हणून हे तत्त्व श्रद्धेचा विषय आहे. नित्य - निरंतर. कोणत्या काळात हे तत्त्व नव्हते किंवा रहाणार नाही अशी ही गोष्टच नाही. कायम रहाणारे हे तत्त्व आहे.

नसे पीत ना श्वेत ना श्याम काही।
नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाही।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥

शरीरिण: इमे देहा: अन्तवन्त इति उक्ता:। या संपूर्ण संसारात जेवढी म्हणून शरीरे आहेत त्या सर्वांना अंत आहे. इथे देहा: हे बहुवचन आणि शरीरिण: एकवचन वापरले आहे. कारण सगळ्या शरीरांमध्ये एकच आत्मा आहे आणि तो नित्य आणि अविनाशी आहे पण त्याने शरीर धारण केले आहे, त्या शरीराला आपले मानले आहे. त्यामुळे जीवात्म्याच्या ठिकाणी अहंता, मीपणा उत्पन्न झाला. जसे आपल्याला धनात ठेवले तर 'मी धनी आहे'

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | |
|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 |
| Monday | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 |

9.00 जर राज्यात ठेवले तर 'मी राजा आहे' 'मी
भिकारी आहे' असे वाटते. त्याचप्रमाणे तो म्हणू
10.00 लागतो 'मी शरीर आहे'. जडतेशी संयोग
झाल्याने सर्व विकार निर्माण होतात. परंतु
11.00 शरीरापासून मी वेगळा आहे असा विवेक झाला
तर त्या विवेकाचा आदर करतात ते पंडित
12.00 असतात. याच कारणासाठी तू शोक करू नकोस
युद्ध कर.
1.00 (१९) हा शरीरी (जीवात्मा) मारणारा नाही किंवा
मरणाराही नाही. हा निर्विकारपणे निश्चल,
2.00 निरंतर जसाच्या तसा राहणारा आहे. म्हणून या
शरीराविषयी शोक करू नकोस.
3.00 जो याला मारणारा किंवा मरणारा समजतो
ते दोघेही जाणत नाहीत की हा मारतही नाही
4.00 आणि मरतही नाही. हा क्रियारहित आहे.
(२०) शरीरात सहा विकार असतात. — निरुक्त —
5.00 जायते, अस्ति, विपरिणमते, वर्धते, अपक्षीयते, विनश्यति।
म्हणजे उत्पन्न होणे, सत्तावान दिसणे, बदलणे, वाढणे,
6.00 ऱ्हास होणे, नष्ट होणे.
एकाच गोष्टीचा पुनरुच्चार केला आहे.
7.00 अज - न जायते, न म्रियते - न हन्यते
शाश्वत - एकरस, पुराण - जुना
8.00 हा आत्मा कधीही जन्मत नाही आणि मरतही नाही.
तसेच हा एकदा उत्पन्न झाल्यानंतर पुन्हा उत्पन्न
होणारा नाही. कारण हा जन्म नसलेला, नित्य, सनातन
आणि प्राचीन आहे. शरीर मारले तरी हा मारला जात नाही.

© www.madhraveeraghuveer.com

१९ व्या श्लोकात 'न हन्यते' या भागाचा विस्तार २० व्या श्लोकात केला आहे.

(२१) आता २१ व्या श्लोकात 'न हन्ति' म्हणजे हा कोणालाही मारत नाही या कल्पनेचा विस्तार केलेला आहे. हा देही (जीवात्मा) कोणालाही मारणारा होऊ शकत नाही कारण यामध्ये कर्तेपणा नाही. म्हणून हा कोणत्याही क्रियेचा कर्ताही नाही आणि कर्मही नाही. म्हणजे हा मरतही नाही आणि मारतही नाही. वेद - जाणतो.

अर्थ - हे पार्था! जो (मनुष्य) या शरीराला अविनाशी नित्य, अज आणि अव्यय (अविकारी) असे जाणतो तो कसा कोणाला मारणार आणि मारविणार?

मनुष्य कपडे बदलतो त्याचे उदाहरण येथे (२२) दिले आहे. त्याप्रमाणे जुन्या वस्त्राच्या बदलण्याने मनुष्याला शोक होत नाही त्याचप्रमाणे शरीराच्या बदलण्याने सुद्धा शोक व्हायला नको. जुन्या शरीराला सोडणे याला मरण म्हणतात व नव्या शरीराला धारण करणे म्हणजे जन्म!

परंतु जुन्या वस्त्राचा सिद्धान्त शरीराला तंतोतंत कसा लागू होईल? कारण शरीरे तर लहान मुलांची किंवा तरुणांचीही मरतात. तर ह्याला उत्तर असे आहे की आयुष्य समाप्त झाल्यावर शरीर नष्ट होते आणि आयुष्य नष्ट होणेच शरीराचे जीर्ण होणे आहे. शरीर - मग ते लहान मुलाचे असो की वृद्धाचे आयुष्य समाप्तीत ते

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

जीर्णच समजले जाते

येथे 'यथा - तथा' चा प्रयोग योग्य नव्हे ?

कारण वस्त्रे धारण करण्यात स्वतंत्रता आहे पण शरीर सोडण्यात किंवा धारण करण्यात जीवात्म्याची स्वतंत्रता नाही. परंतु जसे जुने वस्त्र टाकून धारण करणारा तोच असतो, त्याचप्रमाणे वेगळे शरीर धारण करणारा तो देही म्हणजेच जीवात्मा तो निर्लिप्तपणाने रहातो.

नवीन कपडे वापरण्यात सुख होते पण जुने शरीर टाकून नवे शरीर धारण करण्यात दुःख का होते ?

याचे कारण खरे म्हणजे दुःख मरण्यामुळे होत नाही तर जिवंत रहाण्याच्या इच्छेमध्ये बाधा आल्यामुळे होते. जेव्हा मनुष्य शरीराशी एकात्मता धारण करतो, तेव्हा तो शरीराच्या मरणाला आपले मरण मानतो त्यामुळे दुःखी होतो. परंतु जो शरीराशी एकात्मता ठेवत नाही त्याला दुःख होत नाही.

लहान मुले जुने कपडे बदलून नवे कपडे घालताना सुद्धा कधी कधी रडतात.

वस्त्र — गृह्णाति — एकाच जागी
शरीर — संयाति — अन्य देहात जावे लागते.

(२३) शरीरीच्या म्हणजेच आत्म्याच्या निर्विकारतेचे वर्णन पूर्वी दृष्टान्तरूपाने केले आहे. आता पुढील 3 श्लोकात त्याचेच वेगळ्या प्रकाराने वर्णन आहे.

©www.madhaveeraghuveer.com

दासबोध - ६.३.४
६.२.३६

श्री समर्थांनी त्या सद्वस्तुचे वर्णन अगदी नेमक्या शब्दात केले आहे.

फुटेना। तुटेना चळेना ढळेना।
सदा संचले मीपणे ते कळेना।
तया एकरूपासी दुजें न साहे।
मना संत आनंद शोधूनि पाहे॥

म्हणजेच शस्त्रे याला छेदू शकत नाहीत. अग्नी याला जाळू शकत नाही. पाणी याला भिजवू शकत नाही. आणि वारा सुकवू शकत नाही.

म्हणजेच हे जे आत्मतत्त्व आहे, त्याच्यावर पंचमहाभूतांचाही काही परिणाम होत नाही. सर्व शस्त्रे पृथ्वीतत्त्वापासून तयार झाली आहेत ते पृथ्वीतत्त्व या आत्म्यापर्यंत पोहोचू सुद्धा शकत नाही. तर विकृती करण्याची गोष्ट तर दूरच. तेच अग्नीतत्त्व, जलतत्त्व व वायुतत्त्व याबद्दल सांगितले आहे. यात आकाशतत्त्व नाही परंतु या सर्वांसाठी जागा आकाशतत्त्व देते. आकाशामध्ये स्वतः कोणतीही क्रिया करण्याची शक्ती नाही. पण हा नित्यतत्त्व आहे. सर्वात सूक्ष्म जे आकाश त्याहूनही ते सूक्ष्म (व्यापक) आहे.

त्यापासून इतर चारही तत्त्वांना स्फूर्ति मिळते ती तत्त्वे याला नुकसान करू शकत नाहीत. या श्लोकात त्याचे 'नाहीपणाने' वर्णन केले आहे. विविध भौतिक कसोट्या याला लावता येत नाहीत.

(२४) २३ व्या श्लोकात आत्म्याचे वर्णन केलेले आहे. तो पंचमहाभूतांपासून निर्लिप्त आहे. ती तत्त्वे याचे काही नुकसान करू शकत नाहीत. म्हणजे शस्त्रे कापू शकत नाहीत वगैरे मग पुन्हा तो अच्छेद्य आहे असे सांगण्याचे कारण काय? तर शस्त्राने तर नाहीच परंतु मंत्र, शाप इ० नी सुद्धा हा कापला जाऊ शकत नाही, किंवा जाळला जाऊ शकत नाही.

मालकंस रागाने दगडाला पाझर फुटतो किंवा चंद्रकांत मणी चंद्राला पाहून ओला होतो परंतु हा पाण्याने किंवा अशा कोणत्याही गोष्टीने भिजत नाही म्हणून हा अक्लेद्य आहे.

अगस्ती ऋषींनी समुद्राचे शोषण केले तसे याला कोणीही शक्तीने शोषू शकत नाही म्हणून हा अशोष्य आहे.

एव च असाच आहे. निःसंदिग्धपणाने ठामपणे, निश्चितपणे हा असाच आहे. यात loopholes नाहीत. पळवाटा नाहीत.

नित्य - निरंतर, सर्वदा

सर्वगत - एकरूपाने सर्वत्र विद्यमान आहे.

अचल - हा स्थिर आहे, यात येण्याजाण्याची क्रिया नाही

स्थाणु - स्थिर स्वभावाचा. अचल व स्थाणु यामध्ये फरक आहे. वृक्ष अचल असतात परंतु हलतात तसाही हा नाही - सनातन - हा अनादि आहे. एखाद्या काळात हा नव्हता असेही नाही.

गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर । गेले धनाचे कुबेर । मृत्युपंथे ॥
गेली पंडितांची थाटे । गेली शब्दांची कचाटे । गेली वादक अचाटे । नामामृतें

(२५) हा अप्रकट, चिंतन करता न येण्यासारखा आणि अविकारी असा आहे असे जाणून घेऊन वागलास तर शोक होणे तुला शक्य नाही.

आत्मा अव्यक्त आहे म्हणजेच तो इंद्रियगोचर नाही. तो अचिन्त्य आहे. प्रत्यक्ष किंवा अनुमानाने त्याचे रूप उलगडत नाही. तो क्रियाशील नसल्याने अविकारी आहे. असे याचे वर्णन केले गेले आहे.

तस्माद् - उपसंहार

(२६) आत्म्याला विकारी मानणारे चार संप्रदाय आहेत.
१) बौद्ध २) लोकायत ३) चार्वाकवादी ४) तार्किक
या सर्वांची मते बुद्धीवर आधारलेली आहेत. परंतु आत्म्याचा अनुभव बुद्धीने येत नाही.

बुद्धी प्रथम निश्चयात्मिका व्हावी लागते. त्यानंतर तिला धृतीची जोड लागते. नंतर ती जशी सूक्ष्म होईल तशी ती प्रज्ञेत बदलते. अर्थात ती सूक्ष्मातिसूक्ष्म होऊ लागते. शेवटी प्रज्ञाचक्षूंनी आत्मदर्शन होते. तात्पर्य - आत्मा विकारी आहे असे म्हणणाऱ्यांची मते अतार्किक व अविवेकी असतात.

अथ - आणि जरी तू याला नित्य जन्मणारा किंवा नित्य मरणारा मानत असशील तरी देखील हे महाबाहो अर्जुना, तू असा शोक करायला योग्य नाहीस. मृत्यु म्हणजे पंचमहाभूतांचे विघटन.

चार्वाक - यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥

भारतीय - मी आत्मा आहे, मला देह प्राप्त झाला.
पाश्चात्य - मी देह आहे, मला आत्मा प्राप्त झाला.

© www.madhaveeraghuveer.com

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

ध्रुव - अटळ, निश्चित

(२७) कारण जन्मलेल्याला निश्चित मरण आणि मेलेल्याला निश्चित जन्म हे सिद्ध झाले म्हणून निरुपायच असलेल्या गोष्टीविषयी शोक करण्याला तू योग्य नाहीस.

कबीराचा एक सुंदर दोहा आहे

शोक उसका कीजिए, जो अनहोनी होय।
अनहोनी होती नहीं, जो होनी सो होय॥

न घडणारी गोष्ट घडली तर दुःख करा ना। घरोघरी मृत्यु होतात मग टाहो का फोडता? जन्म मृत्युच्या चक्रामध्ये मनुष्य सारखा फिरतच असतो. उपजे ते नाशे, नाशले पुनरपि दिसे।
हे घटिकायंत्र तैसे। परिभ्रमे गा॥

(२८) अर्जुनाचा शोक अस्थायी आहे आता समोर जे नातेवाईक दिसत आहेत ते पूर्वी अव्यक्त होते, आता व्यक्त आहेत. मृत्युनंतर ते पुन्हा अव्यक्त होणार आहेत. हे सर्व प्राणी पूर्वी शरीररहित होते मरणानंतरही शरीररहितच असणार आहेत. मध्यंतरी काही काळापुरतेच यांनी शरीर धारण केले आहे. मग याविषयी चिंता का करतोस?

ज्याप्रमाणे स्वप्नात दिसणाऱ्या गोष्टी स्वप्न पडण्यापूर्वी नसतात व स्वप्नातून जागे झाल्यावरही नसतात. काही काळापुरत्याच त्या असतात. म्हणून तू शोक तरी कशासाठी करतो आहेस तेच मला समजत नाही.

गाझी लीडर असो सिकंदर किंवा कैसर हार।
घुसे अशी मानेवरती
मृत्युची तलवार ॥ ह्या ॥

(२९) आत्मा दुर्लभ आहे. त्याचे ज्ञान महाकठीण आहे
ब्रह्मज्ञानपरत्वे मनुष्यमात्राचे पाच वर्ग करता येतात
१. ब्रह्मज्ञानी होऊन उपदेश न करणारे - एकांतवासी
२. ज्ञानी होऊन उपदेश करणारे - संत महात्मे
३. श्रवण करून समजणारे - श्रवणभक्ती करणारे
४. श्रवण करून न समजणारे - आत्मानुभव नाही.
५. या चारांपैकी कोणतीच गोष्ट न करणारे
अवधूत, आचार्य/संत, भक्त, मुमुक्षु व जनसामान्य.

(30) आत्मरूप चैतन्य सर्व देहात आहे आणि ते निरवयवात्मक असून अवध्य अवयवरहित आहे. आणि नित्य आहे. देह नाशवंत आहे आणि देही (आत्मा) अविनाशी आहे. मग जे नाशवंत आहे त्याचा शोक करणे योग्य नाही.

वरील २९ पर्यंत श्लोकात आत्म्याविषयी जे तत्त्वज्ञान सांगितले आहे त्याचा उपसंहार 'तस्मात्' या शब्दाने केला आहे आणि या विषयातले निरूपण आटपते घेतले आहे.

ज्याप्रमाणे कोळी आपल्या तोंडावाटे तंतू काढतो किंवा अग्नीपासून लहान लहान ठिणग्या उडतात त्याप्रमाणे या आत्म्यापासून सर्व प्राणी, सर्व लोक, देव, भूते निघतात हे भूतमात्र मिथ्या आहेत. व त्यांना मारणे किंवा ती मरण पावणे हेही मिथ्याच आहे. जो अविनाशी आहे त्याचा शोक करणे योग्य नव्हे.

चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्यु पावती ॥ ३.९.३६ ॥
गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर ।
गेले धनाचे कुबेर । मृत्युपंथे ॥ ३.९.१० ॥

02 March Monday
Week 10
061-304

2009

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

9.00 इथपर्यंत भगवंत अविनाशी आत्मा आणि नाशवंत देह याबद्दल सांगत आहेत आणि या नश्वर देहासाठी
10.00 शोक करणे कसे अयोग्य आहे हे पुन्हापुन्हा सांगत आहेत. आता मात्र ते स्वधर्माविषयी म्हणजेच क्षात्रधर्मा
11.00 विषयी विवेचन करत आहेत.

अर्जुन हा क्षत्रिय होता. त्यामुळे क्षत्रियांचे कर्तव्य
12.00 काय आहे हे आता भगवंत सांगत आहेत.

(31) स्वतःच्या धर्माचा जरी विचार केलास तरीसुद्धा
1.00 तू विचलित होणे योग्य नाही कारण धर्मयुद्धापेक्षा अधिक श्रेयस्कर (कल्याणकारक) दुसरे काहीही नसते.
2.00 हे धर्मयुद्ध ही एक उत्तम संधीच आहे.

युद्धापूर्वीचा कुंतीचा निरोप देखील हेच सांगतो.
3.00 ज्यासाठी क्षत्रिय स्त्री मुलाला जन्म देते ते करण्याचा काळ आता आला आहे.

4.00 (32) आणि त्यातही हे युद्ध म्हणजे धर्मयुद्ध आहे हे काही श्री, सत्ता, राज्य मिळवण्यासाठी केले
5.00 जाणारे सर्वसाधारण युद्ध नव्हे तर न्यायासाठी, नीतिसाठी असे युद्ध करणे आवश्यकच आहे. युद्ध दोन
6.00 प्रकारचे असते. १. वृत्तिफलक २. धर्मफलक

हे अशा प्रकारचे धर्मयुद्ध म्हणजे स्वर्गाचे आपोआप
7.00 उघडलेले दार आहे असे तू समज. काही भाग्यवंत क्षत्रियांनाच अशा प्रकारचे युद्ध लढणे नशिबात असते
8.00 आणि असे युद्ध करण्याची संधी मिळत असताना ती हातची सोडणे म्हणजे करंटेपणा आहे.

स्वकर्तव्यरूप धर्मयुद्ध हेच अर्जुनाच्या कल्याणाचे

[प्रसंगी - माधवराव पेशवे
रामशास्त्री यांचे उदाहरण]

एतद् धनञ्जयो वाच्यो नित्योद्युक्तो वृकोदरः ।
यदर्थं क्षत्रिया सूते कालोऽयमागतः ॥

साधन आहे. शरीर केंद्रित वृत्तीमुळे आणि मृत्युच्या भीती-मुळे कर्तव्याचे विस्मरण होते. त्यामुळे बुद्धी विचलित होते. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या वयामध्ये स्वधर्म बदलतो. भूमिकेनुसार स्वधर्म पाळणे योग्य.

एखादी गायीचे दूध पचायला हलके असले तरी जर वैद्यकशास्त्राने अमुक एक आजारात देऊ नये असे सांगितले असेल आणि आग्रहाने जर नवज्वरात दिलेच तर ते विषवत (मारक) होते. त्याप्रमाणे भलत्याच ठिकाणी भलते केले असता हेतूचा नाश होतो. त्याने आचरण केले असता कोणतेही दोष लागायचा नाही, त्या आपल्या स्वधर्माकडे लक्ष दे. ज्याप्रमाणे सरळ रस्त्याने चालले असता मुळीच अपाय पोहोचत नाही, त्याप्रमाणे स्वधर्माने वागले असता सगळ्या इच्छा आपोआप पुऱ्या होतात.

अर्जुनास ब्रह्मज्ञानाचा उपदेश यथार्थरीत्या समजत नसावा अशी शंका भगवंतांना आली. तो नीट होण्यासाठी स्वधर्माचरणाने त्याची चित्तशुद्धी व्हावी व त्याची अवस्था अतोभ्रष्टस्ततोभ्रष्ट अशी होऊ नये, त्याचा भ्रमनिरास व्हावा म्हणून भगवंत त्याला सांगत आहेत. क्षत्रियाचा धर्मच असा आहे की युद्ध करण्यासाठी कोणीही संमुख होऊन आला तर त्यांना युद्ध करावेच लागते. या युद्धप्रसंगाला कारण पांडव नव्हते. त्यांना इच्छेविरुद्ध करावे लागत होते. अशा युद्धातून पराङ्मुख झाल्यास मोठा अनर्थ ओढवणार होता. धर्मशास्त्र सांगते की क्षत्रियाने हातात शस्त्र घेऊन शत्रूचा नाश करून पृथ्वीचे पालन करावे

© www.madhaveeraghuveer.com

मनुस्मृती देखील हेच सांगते. युद्ध करणे हा क्षत्रियांचा मुख्य धर्म आहे. त्याचा अवलंब करावा आणि ते करावे लागत आहे म्हणून शोक करू नये. मनुचे एक वचन असे आहे —

संग्रामेष्वनिवर्तित्वं प्रजानां चैव पालनम् ।
शुश्रूषा ब्राह्मणानां च राज्ञः श्रेयस्करं परम् ॥

म्हणजेच संग्रामातून परत न येणे, प्रजेचे पालन करणे, ब्राह्मणांची सेवा करणे या गोष्टी राजास परम श्रेयस्कर आहेत.

युद्ध होणार हे अर्जुनाचे भाग्यच आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.— ज्याप्रमाणे जांभई देण्यासाठी तोंड उघडले असता अकस्मात अमृत येऊन मुखात पडावे त्याप्रमाणे स्वकर्तव्य चोख पार पाडण्यासाठी हे धर्मयुद्ध अनायासे प्राप्त झाले आहे, असे अर्जुनाने समजावे, हेच भगवंताचे सांगणे आहे.

(33) युद्ध न केल्यास त्याचे भयावह परिणाम होतील.

१. अर्जुन शत्रूकडून मारला जाईल. परिणामी पांडवांचा म्हणजेच धर्माचा पराभव होईल.

२. स्वधर्माचा त्याग केल्याचे पाप अर्जुनाला लागेल.

३. आतापर्यंत अर्जुनाने मिळवलेल्या कीर्तीचा नाश होईल.

४. पांडवांवर विसंबून जे राजे युद्धासाठी गोळा झाले, त्यांचा विश्वासघात होईल.

आणि या सर्वांचा परिणाम म्हणून अधर्म माजेल. या सर्वांमुळे अर्जुनाला केवळ पापच लागेल असे नाही तर त्याची अपकीर्ति होईल.

© www.madhavaraghuveer.com

(३४) अपकीर्ती हा मृत्यूच - अपकीर्तीचे भय प्रत्येक सद्वर्तनी माणसाला असते.

अपकीर्तीचा डाग कल्पांतापर्यंतही जात नाही. आणि सर्व लोक तुझ्या अपकीर्तीबद्दल सारखे बोलत राहतील. आणि अशी अपकीर्ती मरणाहूनही वाईट असते. पांढऱ्याशुभ्र कपड्यावरचा डाग उठून दिसतो. धवल चारित्र्यावरचा कलंक सन्मान्य पुरुषाला सहवत नाही. म्हणून युद्ध न करण्याचा विचार तू सोडून दे.

(३५) अर्जुनाला स्वजनांशी लढणे योग्य वाटत नाही हे जरी खरे असले तरी कौरवांना तशी भावना वाटणार नाही. ते त्याच्यावर तुटून पडतील. अर्जुनाच्या मनात जागलेली करुणा शत्रूला मान्य होणार नाही. 'अर्जुन युद्धाला भ्याला' असेच सर्वजण म्हणतील.

त्यामुळे ज्यांना तू आदरणीय, सन्माननीय वाटत होतास यांच्याकडून तुला तुच्छता मिळेल. महारथी लोकही तुला युद्धातून पळून गेलेला समजतील.

म्हणून जाणून घे की स्वधर्म टाकणे हा महादोष!

स्वधर्मापासून ढळणारी व्यक्ती शास्त्राविहित आचरणापासून ढळते, त्या व्यक्तीला पाप लागते त्याचे सद्गुण नाश पावतात. याचा परिणाम कुटुंबावर, समाजावर होतो. गुरुदृष्टीतून, शास्त्रदृष्टीतून, आप्तेष्ट दृष्टीतून अशी व्यक्ती निंदेला, उपहासाला प्राप्त होते हे अतिशय क्लेशदायक आहे.

(३६) अर्जुनाला जरी वाटत असले की आपण दया केली चांगलेच वागलो तरी इतर लोक त्याला पळपुटा म्हणतील

© www.madhaveeraghuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |



(३४) अपकीर्ती ही मृत्यूच - अपकीर्तीचे भय प्रत्येक सत्वर्तनी माणसाला असते.

अपकीर्तीचा डाग कल्पांतापर्यंतही जात नाही. आणि सर्व लोक तुझ्या अपकीर्तीबद्दल सारखे बोलत राहतील. आणि अशी अपकीर्ती मरणाहूनही वाईट असते. पांढऱ्याशुभ्र कपड्यावरचा डाग उठून दिसतो. धवल चारित्र्यावरचा कलंक सन्मान्य पुरुषाला साहवत नाही. म्हणून युद्ध न करण्याचा विचार तू सोडून दे.

(३५) अर्जुनाला स्वजनांशी लढणे योग्य वाटत नाही हे जरी खरे असले तरी कौरवांना तशी भावना वाटणार नाही. ते त्याच्यावर तुटून पडतील. अर्जुनाच्या मनात जागलेली करुणा शत्रूला मान्य होणार नाही. अर्जुन युद्धाला भ्याला असेच सर्वजण म्हणतील.

यामुळे ज्यांना तू आदरणीय, सन्माननीय वाटत होतास त्यांच्याकडून तुला तुच्छता मिळेल. महारथी लोकही तुला युद्धातून पळून गेलेला समजतील.

म्हणून जाणून घे की स्वधर्म टाकणे हा महादोष!

स्वधर्मापासून ढळणारी व्यक्ती शास्त्रविहित आचरणापासून ढळते, त्या व्यक्तीला पाप लागते त्याचे सद्गुण नाश पावतात. त्याचा परिणाम कुटुंबावर, समाजावर होतो. गुरुदृष्टीतून, शास्त्रदृष्टीतून, आप्तेष्ट दृष्टीतून अशी व्यक्ती निंदेला, उपहासाला प्राप्त होते हे अतिशय क्लेशदायक आहे.

(३६) अर्जुनाला जरी वाटत असले की आपण दया केली चांगलेच वागलो तरी इतर लोक त्याला नपुंसक म्हणतील

©www.madhaveeradhuveer.com

06 March Friday
Week 10
065-300

2009

February

| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

March

| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
|---|---|---|---|---|---|
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

अशी जाणीव भगवंत करून देत आहेत.

युद्ध न करण्याचा निर्णय जर अर्जुनाने घेतला तर त्याच्या कुळाची कीर्ति वाढणार नाहीच उलट कुळाला कलंक लागेल. आणि क्षत्रियाच्या सामर्थ्याची निंदा होण्यासारखे दुसरे दुःख नाही.

निर्णायक युद्धात मारणे किंवा मरणे हे दोनच पर्याय असतात. यापैकी काहीही झाले तरी अर्जुनाचा लाभ कसा होईल हे भगवंत सांगत आहेत

(36) अर्जुना! तू जर जिंकलास तर या पृथ्वीचे राज्य उपभोगशील आणि जर युद्धात मारला गेलास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल.

स्वर्गाची संकल्पना ऋग्वेदात विश्वाचे तीन भाग मानले आहेत. पृथ्वी, अंतरिक्ष, दिव. पुराणात सप्त स्वर्ग आणि सप्त पाताळ अशी चौदा भुवनांची कल्पना आहे. भू: भुव: स्व: मह: जन: तप: सत्यम् यापैकी तिसरा लोक हा पुराणोक्त स्वर्ग होय. पुण्यशील आत्मे मृत्यूनंतर या लोकात जाऊन विहार करतात.

ऋग्वेदात स्वर्ग हे नाव नाही. पण मृत्यूनंतर मिळणाऱ्या एका उत्तम लोकाची कल्पना मात्र आहे. स्वर्गीय जीवन भौतिक सुखांनी परिपूर्ण आणि कष्टा-पासून मुक्त असते. एक चपळ घोडा एक हजार दिवसात जितका दौडेल तितक्या अंतरावर भूलोकीपासून स्वर्ग आहे असे म्हटले आहे (ऐ. ब्रा.)

यजुर्वेदात याच उत्तम लोकाला स्वर्ग म्हटले आहे.

© www.madhaveerachiveer.com

यजुर्वेदात स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञ करावा असे म्हटले आहे
'स्वर्गकामो यजेत' अशी श्रुती आहे.
अथर्ववेदात स्वर्गाचे उल्लेख वारंवार येतात.
स्वर्ग हा देवलोक आहे. इंद्र हा सर्वात ज्येष्ठ व श्रेष्ठ
देव असून तो स्वर्गाचा राजा आहे. नंदनवन, कल्पवृक्ष
कामधेनू, मंदाकिनी नदी, अप्रतिम सुंदर अप्सरा, गंधर्व
बृहस्पती, अश्विनीकुमार, अमृताचे कुंड या सर्व गोष्टी
स्वर्गात आहेत. स्वर्गात वास्तव्य करणाऱ्या पुण्यपुरुषांना
क्षुधा, तृषा, रोग आणि चिंता यांची बाधा होत नाही.
ते सदैव सुखाचा उपभोग घेत असतात.
याच्या अगदी उलट नरकाची म्हणजे मरणोत्तर
दुर्गतीची कल्पना ऋग्वेदात अस्पष्ट आली आहे.
कुमार्गी, दुराचारी, पापी, खोट्या बुद्धीचे, असत्य बोलणारे
यांच्यासाठी कृतकर्माचे प्रायश्चित्त भोगण्यासाठी हे
अगाध स्थान निर्माण केले आहे.
अंधःकारमय खड्डा म्हणजे नरक होय.
क्षत्रियाने युद्ध न करणे आणि शत्रूने त्याची अवहेलना
करणे हा क्षत्रियासाठी नरकच होय.
(३८) समत्वानेच युद्ध करावे. - सुख आणि दुःख सारखेच
मानायचे आणि युद्ध करायचे - परंतु हे अवघड आहे.
पण दुसऱ्या अध्यायाचे हे वैशिष्ट्य आहे - समत्व
समत्व आणि समत्व! फलप्राप्तीची अपेक्षा न करता
केवळ निरहंकार होऊन स्वधर्मविहित कर्म करावे
म्हणजे पाप लागत नाही. अशा वृत्तीचा अवलंब केला
असता चित्तशुद्धी होऊन मोक्षप्राप्ती सुलभ होते.



© www.madhaveeraghuveer.com

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

येथपर्यंत भगवंतांनी ज्ञानयोग सांगितला आता ते कर्मयोगाचा प्रस्ताव करीत आहेत.

भगवंतांनी ११ ते ३० श्लोकांमध्ये ज्ञानयोग तर ३१ ते ३८ श्लोकांमध्ये कर्मयोग सांगितला. आता या दोन्हीचे अनुसरण एकाच वेळी करणे शक्य आहे असा प्रश्न पडेल. अधिकारपरत्वे दोन्ही योगांचे आचरण शक्य आहे.

ज्यामध्ये ऋषिमुनींनी सम्यक् रीतीने, उत्तम प्रकारे विवरण केलेले आहे, त्यास संख्या म्हणतात. [सम् + ख्या] याला दुसरे नाव उपनिषद असे आहे. आणि या उपनिषदांमध्ये ज्याचे (आत्मज्ञानाचे) प्रतिपादन केले आहे त्यास सांख्य म्हणावयाचे. हे सांख्य म्हणजे ब्रह्म होय आणि त्यास जाणण्याची जी बुद्धी तिला सांख्यबुद्धी म्हणतात. हे ब्रह्मज्ञान झाले असता सर्व अनर्थनिवृत्ती होते यथार्थ ज्ञानप्राप्ती होण्यासाठी चित्तशुद्धीची आवश्यकता आहे. व ही चित्तशुद्धी प्राप्त करण्यासाठी कर्म करण्याची आवश्यकता आहे.

(३९) ज्याचे अंतःकरण शुद्ध झालेले असते त्याला ज्ञानयोग सांगितला आहे व ज्याचे अंतःकरण शुद्ध नाही त्याने फलकामना मनात न धरता कर्मयोग केला तर त्याला फलाचे बंधन पडत नाही.

भगवंत म्हणतात - आत्मज्ञानाचा उपदेश केला. आता योगाचा म्हणजे त्याच्या प्राप्तीच्या उपायांचा उपदेश करतो. मी तुला जी योगबुद्धी सांगणार आहे त्या बुद्धीने

© www.madhaveeraghuveer.com

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

| May | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |

2009

March 10
Tuesday
Week 11
069-296

तू युक्त झालास म्हणजे धर्माधर्मांच्या कर्मबंधनातून मुक्त होशील. ही योगबुद्धी अशी उपकारक आहे म्हणून तू ती ऐक.

निष्काम कर्मयोगासाठी ज्ञानयुक्त बुद्धी आवश्यक आहे. म्हणूनच भगवंत योगबुद्धी सांगत आहेत.

(४०) निष्काम कर्माचे पारमार्थिक फळ मिळतेच मिळते

अभिक्रम - बीज, आरंभ

महत: भयात् - जन्ममरणरूपी मोठे भय.

ज्ञान - आत्मज्ञान, विज्ञान, भौतिक ज्ञान

काम्यकर्माची पूर्णता झाली नाही तर फळ शून्य. परंतु निष्काम कर्मयोगाची अल्पशी सुरुवात झाली तरी त्याचे पारमार्थिक फळ मिळते. निष्काम कर्मानुष्ठान चित्तशुद्धी व ज्ञानप्राप्ती असे दुहेरी फळ मिळवून देते.

लहान मुले खेळताना फक्त खेळासाठी म्हणून खेळत असतात पण त्यातून त्यांना व्यायाम आणि आनंद दोन्ही मिळतात.

शास्त्रविहित स्वधर्माचरणामुळे चित्तशुद्धी होते चित्तशुद्धीनंतरच आत्मा जाणण्याची तीव्र इच्छा निर्माण होते. मग मनन श्रवण मननाचा अधिकारी बनतो.

निष्काम कर्मयोग आचरल्यामुळे कर्तृत्वाभिमान कर्माची आसक्ती आणि कर्मफलाची आकांक्षा हे तिन्ही दोष नाहीसे होतात.

आता निष्काम कर्मयोग आचरण्यासाठी कोणत्या स्वरूपाची योगबुद्धी आवश्यक आहे हे भगवंत सांगतात.

निष्कामभाव थोडा जरी असला तरी सत्य आहे. आणि भय महान असले तरी असत्य असते. मणभर कापसाला जाळण्यासाठी मणभर आग लागत नाही. केवळ एक आगकाडी पुरते.

© www.madhaveeraghuveer.com

| February | | | | | | March | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 | Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 | Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 | Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 | Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 | Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 | Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 | Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | | Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

ज्ञानासाठी निश्चयात्मिका बुद्धी हवी.

मानवाने आपल्या जीवनाची दिशा कोणती ठेवावी व त्याद्वारे उन्नत कसे व्हावे, हे स्पष्ट करणारा गीतेतील हा महान श्लोक आहे. या संदर्भात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात —

जैसी दीपकलिका धाकुटी ।
परी बहु तेजाते प्रगटी ।
तैसी सद्बुद्धी हे थेकुटी । म्हणो नये ॥

त्याप्रमाणे दिव्याची ज्योत लहान खरी, पण ती मोठा प्रकाश पाडते, त्याप्रमाणे ह्या सद्बुद्धीला लहान म्हणता येणार नाही.

ज्याप्रमाणे इतर वस्तू ह्या नेहमी मिळतात परंतु परीस तसा मिळत नाही, अमृताचा एखादा थेंब मिळण्यास दैवयोग लागतो, त्याप्रमाणे परमात्मा हा ज्याचे अंतिम ध्येय आहे ती सद्बुद्धी दुर्लभ आहे.

व्यवसायात्मिका बुद्धी नेहमी ईश्वरनिष्ठच असते. त्यामुळे आत्मसुख लाभते. आत्मज्ञान होते. धर्मशास्त्राने मनाचे दोन प्रकार सांगितले आहेत. शुद्ध मन, अशुद्ध मन. कामसंकल्प असलेले अशुद्ध मन व कामनेचा त्याग केलेले शुद्ध मन.

व्यवसायात्मिका बुद्धीसाठी शुद्ध मन पाहिजे. मानवाची बुद्धी परमात्म्याकडे म्हणजे एकात्मतेकडे जाणारी असावी. विघटनाकडे जाणारी बुद्धी कधीही ईश्वरनिष्ठ असू शकत नाही.

© www.madhavweer.com

बहुशाखा बुध्दी विनाशक - प्रपंचामध्ये आपल्याला परमात्म्याचे अनुसंधान लाभावे म्हणून निश्चल बुध्दी लागते. पण अनेक ठिकाणी धावणारी बुध्दी निश्चल होऊ शकत नाही, तिथे मन बुध्दीचे ऐक्य करता येत नाही. अशी माणसे भोगासक्त असतात. ती भोगवादाचे समर्थन करतात. अशी माणसे समाजाला खालच्या स्तराकडे नेतात.

मनुष्य प्रकृतीवर आधिष्ठित असतो. तिथून विकृतीकडे जाणे अगदी सोपे असते. पण प्रकृतीकडून संस्कृतीकडे जाणे फार अवघड असते. पण जे अवघड आहे ते करण्यातच पुरुषार्थ आहे.

स्वार्थाकडून परमार्थाकडे जाताना मधली पायरी पुरुषार्थाची आहे त्यासाठी चंचल मनाला बुध्दीचा अंकुश लावणे आवश्यक आहे.

परंतु बहुशाखा बुध्दीच्या माणसांना ते नको असते. ते स्वत: चुकीचे वागतात व इतरांना चुकीच्या मार्गाने नेतात. हे अधम होत.

ईश्वरनिष्ठ बुध्दी निर्माण करण्यासाठी तम व रज याकडून सत्त्वाकडे आणि त्यानंतर सत्त्वाच्याही अतीत जायला हवे.

रामकृष्ण परमहंस यांचा दृष्टांत - जंगल व तीन चोर - जो लुबाडला गेला तो जीवात्मा व तीन चोर म्हणजे सत्त्व, रज, तम! सत्त्वगुणाने त्याला घरापर्यंत नेले पण घरात नेले नाही. परब्रह्म हे सत्त्वाच्याही अतीत असते. सत्त्वगुणाचाही अहंकार फार असतो.

© www.madhavgeelaghuveer.com

9.00 म्हणूनच निळोबाराय म्हणतात.
शांती क्षमा दया । त्या ही नको पंढरीराया ।
10.00 हे सर्व सद्गुण माझा सहजगुण होऊ देत.
त्या माणसाची बुद्धी बहुशाखा असते. तो प्रयत्न
11.00 तर खूप करतो पण स्वकार्याविषयी निश्चयाने होईल
असे त्याला कदापि वाटत नाही. आपल्या कर्माचे
12.00 फळ आपल्याला मिळेल का याविषयी त्याच्या
चित्ताला नेहमी तळमळ लागून राहते. अशा
1.00 मनुष्याला सुख कोठून असणार? त्याला शांती
कधीच असत नाही.
2.00 अशी बुद्धी असणाऱ्या सकाम मानवाचा स्वभाव
चिंतन, आचार-व्यवहार कसे घातक असतात, हे
3.00 भगवंत पुढील तीन श्लोकात सांगत आहेत.
(४२,४३,४४) कामात्मान:- सकामी पुरुष
4.00 पुष्पितां वाचम् - दिखाऊ वाणी, अविपश्चित:- अविवेकी
समाधौ - परमात्म्याच्या ठिकाणी
5.00 व्यवसायात्मिका - निश्चयात्मक बुद्धी
सकाम कर्म त्याज्यच आहे.
6.00 वेद काम्यकर्म करायला सांगतात ते एवढ्याचसाठी
की चित्तशुद्धी व्हावी. ती प्राप्त होऊन मोक्षदायक ज्ञान
7.00 उपासकास सुलभ व्हावे. ज्याप्रमाणे आई आपल्या
मुलाला "औषध घ्यायचेस तर लाडू मिळेल" असे
8.00 सांगते तिचा उद्देश बालकाच्या ठिकाणी आरोग्य
उत्पन्न व्हावे हा असतो. पण बालकाला मात्र वाटते
की औषध घेतल्यामुळे लाडू मिळणार. पण त्यापासून

अविपश्चित - पढतमूर्ख, अविवेकी

आरोग्य मिळणार" हे त्याच्या गावीही नसते. या बालकाप्रमाणेच काम्यकर्मप्रतिपादक मीमांसकादि लोकांची स्थिती असते. त्यांना सर्व वेद मुखोद्गत असला तरी त्यांचे खरे रहस्य त्यांना उमगत नाही.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. एखाद्या सुगरण स्त्रीने उत्तम पक्वान्ने बनवून ती केवळ द्रव्याच्या आशेने विकून टाकावीत त्याप्रमाणे अविचारी लोक केवळ सुखोपभोगांच्या आशेने हातचा धर्म दवडतात.

सकाम कर्मे आचरणारे स्वर्गाची इच्छा धरतात. परंतु ज्या यज्ञाद्वारे स्वर्ग प्राप्त होणार त्या यज्ञाचा जो भोक्ता-परमात्मा त्यालाच विसरतात. त्या लोकांची बुद्धी अनंत भेदांची असते व्यवसायात्मिका नसते. आता या योगबुद्धीचे निष्काम कर्मयोगाचे रहस्य प्रकट करण्यापूर्वी अर्जुनाने कसे व्हावे हे भगवंत सांगतात. अर्जुनाला त्रिगुणातीत व्हायला सांगतात

(४५) हे अर्जुना! सर्व वेद तिन्ही गुणांचे कार्यरूप अशा संसाराला प्रकाशित करणारे आहेत. पण तू असंसारी अर्थात निष्काम, सुख दुःखादि द्वंद्वाने रहित, नित्य वस्तूमध्ये स्थित, तसेच योग व क्षेम यांची इच्छा न करणारा व आत्मपरायण हो.

Sunday 15

त्रिगुणातीताची चार लक्षणे - वेदही सत्व, रज, तम यांनी व्याप्त आहेत. केवळ उपनिषदादि भाग सात्विक आहे. बाकीचे वेदांचे भाग रज आणि तमो गुणांनी युक्त आहेत. परंतु भगवंत अर्जुनाला सांगतात तू आत्मसुखाला म्हणजेच स्वकर्तव्याला मार्ग आचर. सत्वगुण साधकाला

स्वानुभवाविण वेदांताची पोपटपंची वाया।
स्वप्नी अमृत पिऊनि कुणाची अमर जाहली काया॥

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

स्वरूपाप्रत नेतो परंतु स्वरूपाचे दर्शन काही घडवत नाही म्हणून तू सात्त्विकतेच्याही अतीत हो. परब्रह्म सत्त्वाच्याही पलीकडे आहे.

तू निर्द्वंद्व हो. म्हणजे सुख दुःख, लाभ-हानि, न्याय-अन्याय, शीत-उष्ण ही सगळी द्वंद्वे माणसाच्या वाट्याला येत असतात. यातून तू बाजूला हो. निर्द्वंद्व हो. नित्य सत्त्वस्थ रहा. कारण सत्त्वगुण धारण केल्याशिवाय काही कार्यच घडणार नाही.

आत्मवान् हो - सगळी इंद्रिये आत ठेव. मनाला जिंक. चित्ताच्या सगळ्या प्रवृत्ती काढून टाक. आत्मस्थ हो. आत्मा हेच एकमेव सत्य आहे. आणि त्या आत्म्याचा परमात्म्याशी संवाद होईल

∴ त्रिगुणातीताची चार प्रधान लक्षणे -

१ निर्द्वंद्व २. नित्यसत्त्वस्थ ३. निर्योगक्षेम ४. आत्मवान्

आता इथे अशी शंका उत्पन्न होईल की वेदातही जर रज तम असते तर वेदांचा अभ्यास करावा की नाही? यासाठी भगवंत पुढील श्लोकात मार्गदर्शन करतात

(४६) मनुष्याला सर्व बाजूंनी भरलेला जलाशय मिळाला असता लहानशा जलाशयाची जेवढी गरज राहते. त्याचप्रमाणे चांगल्या प्रकारे ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणांचे सर्व वेदांशी प्रयोजन राहते.

एकदा ब्रह्माचे ज्ञान झाले की त्या ज्ञानी पुरुषासाठी वेदांचा उपयोग अत्यल्प राहतो. कारण तो ज्ञानी पुरुष ब्रह्मानंदातच निमग्न राहतो

© www.madhavaeraghuveer.com

जे ज्ञानी आहेत त्यांनी वेदोक्त कर्मे करावीत का? तर जरूर करावीत पण लक्ष्य मात्र त्या ब्रह्मानंदाचे ठेवावे. जे ज्ञानी आहेत ते वेदार्थाचा विचार करतात. त्यात जे इष्ट आहे, शाश्वत आहे ते साररूपाने ग्रहण करतात.

वेदांचा विषय त्रिगुणात्मक सृष्टी असा आहे त्यातून फक्त सत्त्व म्हणजे ज्ञान स्वीकारावे वेदांनी दिलेली कर्मप्रेरणा स्वीकारावी पण फलासक्ती स्वीकारू नये.

यज्ञयाग रजोगुणात्मक असले तरी तेही करावेत. राष्ट्राच्या, समाजाच्या धारणेसाठी रजोगुण आवश्यक आहे. आणि व्यक्तीच्या उन्नतीसाठी सत्त्वगुण अपरिहार्य आहे हे ध्यानात ठेवावे. ज्ञाननिष्ठा लाभण्यापूर्वी कर्मनिष्ठा टाकता येत नाही चित्तशुद्धीसाठी ईश्वरनिष्ठ बुद्धीने निष्काम कर्म करणे हे अत्यावश्यकच आहे.

त्रिगुणातीत झाले की ब्रह्मानंद प्राप्त होतो ब्रह्मानंदापुढे इतर सर्व प्रकारचे आनंद तुच्छ ठरतात. कर्मफलापासून मिळणारा आनंद क्षणिक असतो. पुन: पुन: त्याची लालसा निर्माण होते त्यामुळे कायमची तृप्ती मुळीच होत नाही. परंतु ब्रह्मानंदाचे तसे नाही. तो प्राप्त झाला असता इतर कोणत्याही सुखाविषयी वासना उरत नाही. इतर भोगांच्या आशेचा स्पर्शही न होऊन त्याची तळमळ नाहीशी होते. तो सर्वदा तृप्त असतो.

© www.madhaveeraghuveer.com

| February | | | | | | March | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 | Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 | Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 | Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 | Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 | Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 | Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 | Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | | Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

त्रिगुणात्मक संसारापासून अलिप्त राहण्यातच जर ब्रह्मानंदप्राप्ती आहे, तर मग निरनिराळ्या कर्मांचा खटाटोप तरी का करावा या प्रश्नाचे समाधान भगवंत पुढील श्लोकात करतात -

(४७) कर्म करणे एवढाच तुझा अधिकार आहे. फळामध्ये कधीही नाही. आणि तू कर्मांच्या फळाची इच्छा करणाराही होऊ नको. त्याचप्रमाणे तुझी कर्म न करण्याविषयीही प्रीती नसावी.

अतिशय महत्त्वाचा श्लोक.

या भूतलावरच्या मानव वगळता सर्व योनी भोग योनी आहेत. तिथे कर्माला कर्तृत्वाला स्वातंत्र्य नाही

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।
धर्मस्तु तेषामधिको विशेषो धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥

आहार, निद्रा, भय, मैथुन हे जसे प्राण्यांचे आहे तसे मनुष्याला सुद्धा आहे पण धर्म आणि धर्माने दिलेले ज्ञान हे मानवाच्या ठायी विशेष आहे. गंधर्व, यक्ष, किन्नर या योनी घेतल्या तरी त्यांना सुद्धा पुण्य सरले की पुन्हा खाली येऊन जन्म घ्यावा लागतो.

मनुष्यालाच जन्म असा आहे की जिथे क्रियमाण कर्म आपल्या हातात आहे. स्वाभाविक क्रियमाण माणसाच्या स्वाधीन आहे.

१६ व्या अध्यायात भगवंत म्हणतात दैवी संपत्तीचा आश्रय केलात तर हा सगळा भवसागर

© www.madhaveeragnuveer.com

ओलांडून जाता येईल. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात

परी कर्मफळी आस न करावी।
आणि कुकर्मी संगती न व्हावी।
हे सत्क्रियाचि आचरावी। हेतुविण॥ (२.२६६)

कर्म करायचे आणि कर्मफळाची आसक्ती टाकून द्यायची. कर्तृत्व आले की भोक्तृत्व येते ते टाळायला हवे. कर्तृत्वामागे सुद्धा मी केले नाही तो परमेश्वरच करतो ही भावना हवी.

आसक्ती आली की काम, क्रोध आले आणि कर्माचा शुद्ध हेतू हरवून बसला आणि म्हणून कर्म अनासक्त रीतीने व्हायला हवे.

कर्तृत्वाचा अहंकार नसला की कर्म आपोआप शुद्ध होते.

सगळ्या मानवजातीला भगवद्गीतेची सगळ्यात महान देणगी कोणती असेल तर ती "निष्काम कर्मयोग" आहे. जगातल्या कोणत्याही ग्रंथात इतके श्रेष्ठ तत्त्वज्ञान सांगितलेले नाही.

मानवाच्या ~~कर्तृत्वा~~ कर्माच्या अधिकारांची मर्यादा कर्म निःस्वार्थ बुद्धीने करण्यामध्ये आहे. कर्तृत्वाचा मदही नको. आणि कर्मफळाचा आस्वाद घ्यावा असेही नको.

असे फलेच्छा न ठेवता कर्म जरी केले तरी त्या त्या कर्माचा काही गुण असतोच त्याचा परिणाम होणारच. उदा० अग्नी किंवा विष त्यामुळे त्यापासून बंध निर्माण होणारच. मग ते करणे इष्ट आहे किंवा नाही?

© www.madhaveeraghuveer.com

| February | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| Monday | | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | |

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

यासाठी भगवंत शंकानिरसन करतात
(४८) आसक्तीला सोडून आणि सिद्धी व असिद्धी यामध्ये समान बुद्धी ठेवणारा होऊन योगस्थ रीतीने कर्म कर. हा समत्वभावच योग म्हटला जातो.

कर्मफलाने प्रेरित होऊन कर्म करू नये हे मागील श्लोकात भगवंतांनी सांगितले आहे. आता ते कर्म कसे करावे हे भगवंत सांगत आहेत. योगात स्थित होणे म्हणजेच पूर्ण वा अपूर्ण कर्मा-विषयी मनाचा समतोलपणा राखणे. हीच खरी योगस्थिती आहे. तिलाच निष्काम कर्मयोग म्हणतात. आणि ज्ञानी पुरुष तिचीच प्रशंसा करतात.

समत्व हाच योगाचा गाभा आहे. सत्य म्हणजेच ब्रह्म। आपण करतो ते प्रत्येक कार्य धर्माला सदाचाराला, नीतीला बळकटी आणण्याचेच करावे. यालाच योगस्थ होणे म्हणतात.

भगवान श्रीकृष्णांचा हा उपदेश आपल्या चरित्रात तंतोतंत उतरवणारे महात्मा म्हणजे 'छत्रपती शिवाजी महाराज' होत. ५५ ते ७० या श्लोकात आलेली महात्म्यांची सर्व लक्षणे शिवाजी महाराजांना लागू पडतात.

सदैव सावध व उद्योगी, दुष्टांचा काळ / गरीबांचा कनवाळू स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यांचे संगोपन करणारा, पापभीरू, पुण्य रणशूर, मातेच्या आज्ञे वचनात राहून अहर्निश राष्ट्राची चिंता करणारा, रयतेला पोटच्या मुलाप्रमाणे वाढवणारा आधुनिक काळचा अद्वितीय राज्यसंस्थापक

'छत्रपती शिवाजी महाराज'! असा हा राजा आपल्या महाराष्ट्रात निर्माण झाला याबद्दल आपण सर्वांनी सदैव अभिमान धारण करावा.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही अनेक क्रांतिकारक झुंजले स्वातंत्र्य मिळालेच तरच आम्ही लढू असा विचार त्यांनी केला नाही. सिद्धी - असिद्धी या दोन्हींना सारखेच मानून त्यांनी स्वातंत्र्ययोग आचरला. मानवाच्या जीवनाचे लक्ष्य उदात्त असले की बाह्यसंग आपोआपच गळतात. मानव उन्नत होतो. योगबुद्धीने आचरतो. काही कर्मे पूर्ण होतात. काही अपूर्णच राहतात. हे जाणून तो स्थिरबुद्धी राहतो

(४९,५०) कौशल्य म्हणजे कर्मातील योग -

कर्मामध्ये योग आला की कुशलता प्राप्त होते. आणि योग म्हणजे काय? तर जिथे समत्व प्रस्थापित होते त्याला योग म्हणतात.

लो. टिळक तुरुंगात सुद्धा शांतपणे झोपी गेले. कारण घरची मऊ गादी काय किंवा तुरुंगातील दगड काय दोन्ही त्यांच्या दृष्टीने सारखेच.

हे समत्व असे आहे की ज्यामुळे बुद्धी स्थिरावते.

Sunday 22

कृपण - काम्यकर्मे करणारास येथे कृपण म्हटले आहे. जो या अक्षरास न जाणता हा लोक सोडून जातो तो कृपण होय.

व्यवहारातही आपण कंजूस माणसाला कृपण म्हणतो. काहीसा तोच अर्थ येथे लागू आहे.

काहि लोक मोठे कष्ट करून धनार्जन करतात पण ते त्या संपत्तीचा उपभोगही घेत नाहीत आणि दानासाठीसुद्धा व्यय करत नाहीत.

दानं भोगो नाशः तिस्रो गतयो भवन्ति वित्तस्य ।
यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥

वास्तविक दानामध्ये धनाचा विनियोग केल्याने होणारे सुख अनीत असते. परंतु धनाची अभिलाषा धरणारे मूढ जन ह्या सुखाचे महत्त्व ओळखत नाहीत. म्हणून त्यांना कृपण किंवा दीन म्हणावयाचे.

बुद्धीयुक्त - बुद्धीला प्रकाशविणारे जे आत्मतत्त्व त्याची प्रचीती बुद्धीला होऊ लागली की ते बुद्धीयुक्त झाले असे म्हणावयाचे. दह्यात लोणी असते परंतु ते मंथन केल्यावाचून दिसत नाही. तसेच काष्ठात अग्नी असतो पण तो ते काष्ठ पेटल्याशिवाय दिसत नाही आणि एकदा पेटल्यावर त्या काष्ठास जाळून टाकणे हा त्याचा स्वभाव आहे.

सर्वगत असा जो आत्मा आहे त्याचा प्र.प्रत्यय जरी बुद्धीस झाला तरी जीव आहे तोपर्यंत बुद्धी कायम राहून तीत आत्मा प्रतिबिंबित होऊन प्रारब्धभोग भोगतो. तरी प्रापंचीकाने निष्काम कर्म करून ह्या बुद्धियोगास योग्य व्हावे. निष्काम बुद्धीने कर्म आचरून जो त्यापासून बंध पावत नाही, तोच खरा कुशल!

© www.madhavveeraghuveer.com

(५१, ५२, ५३) अविद्यामूलक जो भवबंधरूप आमय म्हणजे रोग, तो जेथे कधीही नसतो, त्यास अनामय म्हणतात. जे सुकृतदुष्कृतांचा त्याग करतात, त्यांच्या ठायी समत्व-बुद्धी निर्माण होते. कर्मफलाची यत्किंचितही आशा न धरता ते सारे ब्रह्मार्पण केल्याने प्राप्त होणाऱ्या चित्तशुद्धीच्या योगाने मानव ब्रह्मपदाचा अधिकारी होतो.

भुकेल्या माणसाला अमृत देऊ केले तर त्याला ते नको असते. त्याला अन्नपदार्थ हवे असतात. अशीच गोष्ट वेदवचनात सांगितलेल्या स्वर्गादिफलांची व मोक्षाची आहे. ज्याला मोक्षरूपी अमृत प्राप्त झाले त्याला हे नश्वर परलोकसुख तुच्छ वाटते. याप्रमाणे इतर सुखाविषयी पूर्ण वैराग्य उत्पन्न झाले म्हणजे ब्रह्मज्ञानाचा उदय होतो असा कृतकृत्य होणारा पुरुष म्हणजे स्थितप्रज्ञ.

मोहकलिल- मोहरूपी चिखल जेव्हा तुझी बुद्धी मोहरूपी चिखल ओलांडून जाईल. तेव्हा तुला ऐकलेल्या व ऐकण्यासारख्या गोष्टींविषयी वैराग्य प्राप्त होईल. अनेक प्रकारचे श्रवण ऐकून बुद्धी विचलित होते पण जेव्हा अशी बुद्धी परमात्म्याच्या स्वरूपी अचल व स्थिरपणाने टिकून राहील, तेव्हा समत्वरूप योगाला तू प्राप्त होशील.

भगवंतांनी केलेल्या विवेचनाने अर्जुन अत्यंत सुखावला. पण त्याची जिज्ञासाही वाढली. म्हणून तो प्रश्न करतो

(५४) देवा, जीवनाचे मुख्य सिद्धांत सांगितलेस. ते सिद्धांत आचरणात कसे आणावयाचे ती कलाही

१. स्थितप्रज्ञाची लक्षणे कोणती २. तो काय बोलतो?
३. कसा राहतो ४. आचरण कसे असते?

स्थितप्रज्ञ हा खास गीतेचा शब्द आहे
9.00 सांगितलीस. तरी मला स्पष्ट कल्पना येत नाही.
मला आता चरित्र ऐकायला हवे आहे. सांख्यनिष्ठा
10.00 ज्याच्या बुद्धीत स्थिर झाली आहे, फलत्यागरूप
योग ज्याच्या जीवनात मुरला आहे. अशा पुरुषाची
11.00 लक्षणे मला सांग. फलत्यागाची पूर्ण खोली
दाखवणारा, कर्म समाधीत मग्न असणारा,
12.00 निश्चयाचा महामेरु - ज्याला स्थितप्रज्ञ म्हणावयाचे
तो बोलतो कसा, बसतो कसा, चालतो कसा असे
1.00 सर्व मला सांग. कशी असते ती मूर्ती? ती
कशी ओळखावी? सांग देवा सांग.
2.00 (५५) आता भगवंत स्थितप्रज्ञाची लक्षणे पुढील
अठरा श्लोकांमध्ये सांगत आहेत.
3.00 ज्यावेळी हा पुरुष मनातील सर्व कामनांना टाकून
देतो, त्यावेळी आत्म्यानेच आत्म्याचे ठिकाणी संतुष्ट
4.00 झालेला हा स्थिरबुद्धीचा म्हटला पाहिजे.
इथे पहिलाच घाव घातला आहे तो कामावर. जो
5.00 सर्व कामनांना टाकून देतो. प्र + जहाति म्हणजे
सर्वथैव त्याग करणे. आणि जो आपल्या आत्म्यामध्ये
6.00 आत्म्यानेच संतुष्ट रहातो तो खरा स्थितप्रज्ञ.
कितीही आणि कोणतेही प्रयत्न केले तप आचरले
7.00 देहाला कष्ट दिले, कोणी उपदेशही दिला तरी जोपर्यंत
कामना निःशेष होत नाही तोपर्यंत आत्मस्थितीचा
8.00 अनुभव असणे अशक्य आहे.
प्रारंभी कोणालाच सर्व कामनारहित होणे
अशक्य आहे. म्हणून अशुभ कामना टाकून शुभकामना ध

© www.madhavveer.com

आश्रय घ्यावा. ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करावे
नंतर हळूहळू शुभ कामनाही वर्ज्य करून निष्काम
कर्मयोग आचरावा. त्यामुळे चित्तशुद्धी झाली की
तत्त्वज्ञानाचा उदय होतो. फलस्वरूप असलेली आत्मरती
आत्मतृप्ती आपोआप लाभते. ही वृत्तिच स्थितप्रज्ञता।
ज्ञानेश्वर महाराज म्हणतात – २.२९२
जो सर्वदा नित्यतृप्तु। अंतःकरणभरितु।
स्थितप्रज्ञाचे प्रमुख लक्षण सांगून झाल्यानंतर दुसरा
प्रश्न 'तो बोलतो कसा?' याचे उत्तर देतात.
(५६) दुःख झाले असता ज्याचे मन उद्वेगरहित असते
आणि सुख प्राप्तीत ज्याची इच्छा दूर झाली आहे
प्रीती, भय व क्रोध ही ज्याची नष्ट झाली आहे असा
'मुनि' स्थिरबुद्धी म्हटला जातो.
सुखाचे कारण जे धर्मानुष्ठान ते न करता
सुखाची आकांक्षा करावयाची तिला स्पृहा असे
म्हणतात अशी स्पृहा ज्यास असते तो अविवेकी
समजावा. स्पृहा म्हणजे हर्षरूप चित्तवृत्ती.
मुनि ज्याच्या चित्तातून राग, भय, क्रोध गेले
आहेत असा जो मननशील तो मुनि
स्थितधी जो सर्व कर्मबंधनापासून मुक्त होऊन
एका ब्रह्मस्थान ठिकाणी स्थिरबुद्धी झाला आहे असा
श्रवण, मनन, निदिध्यास आणि मग
आत्मसाक्षात्कार असा आत्मोन्नतीचा क्रम आहे
श्रवणानंतर मनन करतो आणि मनन जो करतो
तो फारसा बोलत नाही. त्याचे कारण आहे 'मौन'

न खिद्यते नो विषयैः प्रमोदते। न सज्जते नापि विरज्यते च।
स्वस्मिन्सदा क्रीडति नन्दति स्वयं निरन्तरानन्दरसेन तृप्तः ॥५३६

– विवेकचूडामणि –

© www.maharaghuveer.com

मौन हे माणसाला आपले मन ईश्वरावर एकाग्र करायला संधी देत असते. ते मौनसुद्धा तीन प्रकारचे आहे.

१. आकारमौन - या मौनात बाकी सर्व व्यवहार चालू रहातात फक्त ठराविक दिवशी ते बोलत नाहीत.

२. काष्ठमौन - काष्ठाला भावना नसते काष्ठामध्ये वासना नसतात. ज्या इच्छा भावना असतील त्यांचा उपशम करायचा. हळूहळू त्या गळून पडतात किंवा शुद्ध होतात. वाईट संस्कार जातात. अंतःकरण पवित्र होऊन जाते. हे मौन साधले की चित्तात कोणत्याही विचारांचे स्पंदन होत नाही.

विचार विरेचन होते परंतु यात सात्विकतेचा अहंकार मनात जागृत असतो.

३. निर्वासन मौन - चित्तातून वासनांचे उच्चाटन झाल्यावर ज्या मौनाचा अनुभव येतो ते निर्वासन मौन।

असे मौन ज्याला धारण करता येते त्याला वाचासिद्धी प्राप्त होते. त्याची प्रज्ञा सुस्थिर होते

कोणत्याही दुःखामुळे स्थितप्रज्ञाचे मन उद्विग्न होत नाही. त्रिविध तापांचा त्याच्यावर परिणाम होत नाही. असा स्थितप्रज्ञ सुखाविषयी देखील निरिच्छ असतो.

(५६) स्थितप्रज्ञ हा नेहमी अनभिस्नेह असतो म्हणजे व्यावहारिक सत्ता नाशवंत आहे हे तो जाणतो म्हणून तो कशातच गुंतत नाही. त्याविषयी हर्ष, खेद, आसक्ती निर्माण होण्याचे काहीच कारण नाही.

© www.madhaveeragruveer.com

तात्पर्य - स्नेह वा आसक्तीचा अभाव, शुभप्राप्तीत हर्षाचा अभाव आणि अशुभप्राप्तीत खेदाचा अभाव ही तीन स्थितप्रज्ञाची लक्षणे आहेत.

(५८) कासवाप्रमाणे इंद्रियजय करावा. कासव आपली इंद्रिये हवी तेव्हा बाहेर काढतो व मनात येईल तेव्हा आत ओढून घेतो. आपली इंद्रियेही आपल्याला अधिकाराने वापरता आली पाहिजेत. आपण इंद्रियांच्या आधीन होता कामा नये.

उपास असताना चमचमीत पदार्थांचा वास आला की काही माणसे उपास मोडायलाही तयार होतात.

पाच इंद्रियांचे पाच आहार आहेत.

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पाच विषय आहेत. इंद्रियांचा आपापला विषय म्हणजे त्यांचा आहार. जी गोष्ट अन्नाबाबत तीच याही आहाराबाबत ध्यानी ठेवावी. अन्न तारी, अन्न मारी. जिभेवर संयम असल्यावाचून शरीराचे आरोग्य राहात नाही. इंद्रियांच्या आहाराबाबतही हाच नियम लागू करायला हवा.

रामकृष्ण परमहंसांनी एक मार्मिक दृष्टांत दिला आहे. कवडी शिपाई. एक माणूस - चोर / राजा



आपण जर इंद्रियांच्या ताब्यात गेलो तर आपण चोर
" " इंद्रियांना ठेवू " " राजा !

भूक लागणे अगदी स्वाभाविक आहे पण अमुकच हवे ही कामना झाली. भोग पाहिजे ही खरी गोष्ट पण गोडीच हवी ही कामना. तेव्हा नैसर्गिक भूक आणि कामना यातील अंतर लक्षात घ्यायला हवे.

(विनोबा) नरदेहाचेनि साधने सच्चिदानंद पदवी घेणे

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

स्वधर्माचरणासाठी देहाला सांभाळले पाहिजे पण त्याचे चोचले पुरवता कामा नये. पळी श्रीखंडात बुडवा किंवा पिठल्यात बुडवा तिला त्याचे काही नाही तसे जिभेचे व्हायला हवे.

शरीराचे भाडे शरीराला देऊन टाकले म्हणजे झाले

© www.madhaveeraghuveer.com

इंद्रियांचा संयम करणे म्हणजे ती रोधून धरणे नव्हे. योग्य वेळ आली असता ती मोकळी सोडता आली पाहिजेत. प्रपंचात आवरून धरावीत आणि परमार्थात मोकळी सोडता यावीत

प्रत्येक मंदिराच्या सभामंडपात दगडी कासव कोरलेले असते. मानवाने ईश्वराच्या दर्शनापूर्वी आपली इंद्रिये कासवाप्रमाणे संयमित करून नंतरच भक्ताने आत प्रवेश करावा हा त्यातील भावार्थ। कासवाप्रमाणे आपल्याला जमतेच असे नाही. काही माणसे दाखवण्यापुरते करतात पण मूळ वृत्ती कधीतरी बाहेर येतेच. अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी।

इंद्रिये विषय समोर ना पाहत नाहीत तोवर शांत असतात पण जेव्हा त्या त्या इंद्रियांचा विषय दृष्टीला पडतो तेव्हा संयम अवघड होऊन बसतो. जोपर्यंत चमचमीत पदार्थ नजरेला पडत नाही तोपर्यंत उपवासाच्या गोष्टी करतात.
"तववरी वैराग्याच्या गोष्टी

इंद्रियनिग्रहात कृत्रिमता नसावी. योगबुद्धीने, प्रज्ञा स्थिर करून इंद्रिये जिंकता यायला हवीत.

गीताई - घेई ओढूनी संपूर्ण विषयांतूनी इंद्रिये।
जसा कासव तो अंगे तेव्हा प्रज्ञा स्थिरावली॥

© www.madhaveeraghuveer.com

(५८) इंद्रियांच्या विषयांचे रेशनिंग करा

एखादा रोगी रोगनिवारणासाठी कित्येक खाद्य किंवा पेय पदार्थांपासून दूर राहू शकतो किंवा काम्यकर्मे करणारा एखादा माणूस व्रतस्थ होऊन सुखविषयांपासून दूर राहू शकतो मग अशा रुग्ण किंवा व्रतस्थ व्यक्तींची तुलना स्थितप्रज्ञाबरोबर करावयाची काय? तर नाही.

कारण केवळ इंद्रियांचे दमन करून उपभोगापासून निवृत्त राहिल्याने समाधी किंवा योग साधत नाही. तर त्या विषयांची वासनाही जेव्हा निवृत्त होते तेव्हाच खरी समाधी साधते. ज्याला ब्रह्मसाक्षात्कार होतो त्याच्या ठायीच विषयवासनेचे निर्मूलन होते.

एखाद्या झाडाची वरवरची पालवी खुडून टाकली तरी मुळाला पाणी असल्याने त्या झाडाचा नाश होत नाही. उलट ते आणखीच विस्तारते. त्याचप्रमाणे नुसते इंद्रियांचे विषय दूर करून भागणार नाही. याबद्दलची आसक्ती मुळापासूनच नाहीशी व्हायला हवी.

'निराहार' याचा अर्थ अन्न खायचे नाही असा नाही. संयमाने वागणे हे आपल्या हातात आहे. मानलेली जी इंद्रिये आहेत त्यांना खेचून ताब्यात ठेवता येते. गीताई –

निराहार बळे बाह्य सोडी विषय साधक।
आतील न सुटे गोडी ती जळे आत्मदर्शने ॥

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

(६०,६१) विपश्चित: बुद्धिमान पुरुष.

हा प्रयत्न करणारा बुद्धिमान पुरुष त्याच्या मनाला देखील ही क्षोभविणारी इंद्रिये हरण करतात.

ब्रह्मज्ञान झाले तरी पूर्व संस्कारामुळे इंद्रिये अनिवार असतात यासाठी इंद्रियजय घडला पाहिजे. इंद्रियग्राम जोवर प्रबल आहे तोपर्यंत त्यास भ्रम होण्याचा संभव असतो. विवेकाने मनोनिग्रह कितीही केला तरी इंद्रियांचा ओढा प्रबळ असतो. ती त्याला विवेकभ्रष्ट करून भवसागरात पुनरपि लोटून देतात. यासाठी विवेकी पुरुषाने विषयसुखाविषयी विराग आणि मन व इंद्रिये यांचे दमन करण्याचा अभ्यास अहर्निश करावा. आणि परमात्मस्वरूपाकडे चित्ताचे लक्ष लावावे. ज्याला राजाश्रय लाभतो त्याला सहसा चोरादिकांचे भय रहात नाही. एकदा ब्रह्माकार वृत्ती झाली की इंद्रियग्रामाचे मनावर काहीएक कार्य होत नाही. आणि नंतर बुद्धी स्थिर होते.

इथे तीन योगांचा समन्वय साधला आहे.

यततो - कर्मयोग, विपश्चित: ज्ञानयोग, } त्रिवेणी संगम
युक्त आसीत मत्पर: - भक्तियोग }

(१२.६३) आत्मनाशाची कारणे - श्रेष्ठ अवस्था कशी प्राप्त होईल हे समजावून घेण्यापूर्वी अध:पात कसा होतो हे आधी कळले पाहिजे म्हणजे ते टाळता येईल कोणत्या मार्गाने जायचे नाही हे आधी कळले पाहिजे. मग योग्य मार्गावरील वाटचाल जरा मंद गतीने झाली तरी चालण्याजोगे असते

अंत:करणात विषयांची नुसती आठवण असेल तर संग टाकलेल्यालाही विषयासक्ती येऊन चिकटते नंतर त्या विषयाच्या प्राप्तीची इच्छा होते. जेथे काम उत्पन्न होतो तेथे क्रोधाने आपले बिऱ्हाड अगोदरच थाटलेले असते आणि क्रोध आला की कार्याकार्याविषयी अविचार येतो. आणि संमोह आल्यावर स्मृती नाश पावते. अशा वेळी हृदयात बुद्धी व्याकुळ होते. बुद्धीला मग भ्रांती होते. ज्ञान समूळ नष्ट होते

लाकडाला ठिणगी लागली व ती एकदा भडकली म्हणजे त्रिभुवनाला जाळण्याला ती समर्थ होते. त्याप्रमाणे विषयांचे चिंतन मनाकडून चुकूनही जरी झाले तरी ते एवढे मोठे पतन शोधीत येते.

अशा रीतीने इंद्रियांच्या आसक्तीपासून सुरुवात झाली की अध:पाताला तळ गाठल्यावाचून ही घसरगुंडी थांबतच नाही

© www.madhaveeraghuveer.com

अर्जुनाने भगवंतांना स्थितप्रज्ञ कसा असतो, त्याची लक्षणे काय? तो बोलतो कसा? त्याचे वागणे कसे? असे प्रश्न विचारले होते. ५४ व ५५ या श्लोकात त्याची व्याख्या सांगून ५८ ते ६३ श्लोकात स्थितप्रज्ञ व इतरजन यातील फरक सुस्पष्ट केला. आता स्थितप्रज्ञाचे आचरण कसे असते ते सांगत आहेत.

(६४, ६५) विधेयात्मा - स्वाधीन अंत:करणाचा पुरुष.
प्रसाद - अंत:करणाची प्रसन्नता.

आशु - लवकरच, पर्यवतिष्ठते - उत्तम प्रकारे स्थिर होते. स्थितप्रज्ञाचे आचरण कसे असते हे सांगताना मनोनिग्रहाची श्रेष्ठता सांगतात. अशा पुरुषाची इंद्रिये त्याच्या स्वाधीन असतात. त्यामुळे रागद्वेषामुळे त्याला व्यामोह होत नाही. अशा प्रकारे चित्ताची प्रसन्नता कायम झाली म्हणजे स्वरूपाचा साक्षात्कार होण्याची पात्रता प्राप्त होते. अशा स्थितीतला मनुष्य प्रारब्धप्राप्त विषयांचा उपभोग घेत असला तरी त्यापासून अनर्थ संभवत नाही.

ज्याचे चित्त प्रसन्न झाले त्याच्या सर्व दु:खांचा नाश होतो. कारण दु:खाचे बीज जी वासना तिचा नि:शेष नाश झाला म्हणजे कुठले दु:ख? विषयांचे अनुराग व द्वेष चित्तातून नाहीसे झाले म्हणजे जरी कदाचित इंद्रिये विषयात रममाण झाली तरी ते विषय बाधक ठरत नाहीत. विषयांच्या ठिकाणी अनासक्त झालेला आत्मानंदात तल्लीन होतो. एका चित्ताच्या प्रसन्नतेने सर्व दु:खाची निवृत्ती होते.

©www.madhaveeraghuveer.com

तुकाराम महाराज म्हणतात -
मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ॥

ज्ञानेश्वर महाराजांनी या संदर्भात दोन सुंदर दृष्टांत दिले आहेत. १) ज्याप्रमाणे अमृताचा झरा ज्याच्या पोटातच उत्पन्न होतो, त्याला तहानभुकेची काय तमा? त्याचप्रमाणे अंतःकरण प्रसन्न झाले तर मग दुःख कसले आणि कोठले? ज्ञाने. (२.३३९.४०)

२) जैसा निर्वातीचा दीपु । सर्वथा नेणे कंपु ।
तैसा स्थिरबुद्धी स्वरूपयोगयुक्तु ॥ (२.३४१)

अशा प्रसन्नतेमुळे प्रपंचाबद्दल अनासक्ती आणि ईश्वरचरणी बुद्धीची स्थिरता असा दुहेरी लाभ होत असतो. परंतु अशी प्रसन्नता लाभली नाही आणि इंद्रिये जिंकली नाहीत तर काय घडते हे भगवंत सांगतात (६६,६७) साधनरहित पुरुषाच्या अंतःकरणात श्रेष्ठ बुद्धी असत नाही. तसेच त्या अयुक्ताच्या अंतःकरणात आस्तिकभाव नसतो. आस्तिकभाव नसलेल्याला शांती नसते. अशा शांतिरहित पुरुषाला सुख कोठून मिळणार? कारण पाण्यात वारा नावेला जसा हरण करतो, तसेच विषयात संचरणाऱ्या इंद्रियांपैकी ज्या इंद्रियाबरोबर मन राहते ते एकच इंद्रिय या अयुक्त पुरुषाची बुद्धी हरण करून घेते.

केवळ एक इंद्रिय अनावर झाले तर एवढा अनर्थ होतो तर जेव्हा सर्व इंद्रिये अनावर झाली तर मग त्याचा केवढा नाश होईल?



© www.madhaveeraghuveer.com

इंद्रियांच्या आधीन झालेले चंचल मन - पाणी
या मनोजलावर तरंगणारी सुदृढ नाव - प्रज्ञा.
महावायूचा झपाटा - इंद्रिये
पैलतीर - स्वरूपभूमी.

या ब्रह्मज्ञानरूपी भूमीच्या ठायी ही प्रज्ञानाव अगदी निश्चळ राहिली पाहिजे. इंद्रियवायू कितीही जोराचा सुटला तरी तेथून ती यत्किंचितही ढळता कामा नये.

स्थितप्रज्ञ हा योगयुक्त असतो. जो योगयुक्त नसतो. त्याची बुद्धी स्थिर होत नाही. निश्चळत्वाची भावना त्याच्या चित्तात जागत नाही, त्याच्या ठायी शांतीचा जिव्हाळा नसतो यामुळे त्याला सुख वाटत नाही. त्याच्या मनाची चंचलता हेच त्याच्या दुःखाचे सार असते. म्हणून ज्ञानेश्वर माऊली म्हणतात -

याकारणें इंद्रियांचें । दमन कीजे ॥

म्हणून मानवाने निषिद्ध भोग घेऊ नयेत. केवळ धर्मशास्त्रावर आधारित विषयच सेवावा।

बुद्धी स्थिर कशी होते हे सांगताना भगवंत म्हणतात -

(६८) ज्या पुरुषाची इंद्रिये सर्व प्रकारे इंद्रियांच्या विषयांपासून आवरून धरलेली असतात त्याची बुद्धी स्थिर होते.

इंद्रियजयाने बुद्धी स्थिर होते. जो तीव्र वैराग्याच्या साहाय्याने सर्व इंद्रिये त्यांच्या विषयांपासून निवृत्त करतो त्याला समाधीसिद्धी घडून त्याची प्रज्ञा

© www.madhaveeraghuveer.com

9.00 प्रतिष्ठिता म्हणजे स्थिर होते यातच खरे सुख
आहे इतरत्र नाही. साधकाला हा निग्रह कष्टसाध्य
10.00 तर सिद्धाला हा सहज साधतो
एखाद्या सापाचे दात काढल्यावर त्याचा
11.00 विषारीपणा नाहीसा होतो त्याप्रमाणे इंद्रियांचे
अनुराग व द्वेष हे दोन दात उखडून टाकतात
12.00 म्हणजे इंद्रियांचे विषयरूप विष आपोआपच नाहीसे
होते. मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह साधकाला अवघड
1.00 परंतु सिद्धाला सोपे वाटतात.
या स्थितप्रज्ञाचे आचरण कसे असते?
2.00 (६९) योग्याचे दिवस रात्र. स्थितप्रज्ञ जो असतो तो
अज्ञानरूपी निद्रेचे निरसन करून स्वस्वरूपी बुद्धीने
3.00 जागवीत असतो.
द्वैतदर्शनरूप जी अविद्या ही दुसरी रात्र होय.
4.00 या रात्रीच्या ठायी विषयनिष्ठ जन जागृत असतात
परंतु स्थितप्रज्ञाच्या दृष्टीने ही निशा असते.
5.00 हा फार श्रेष्ठ असा श्लोक आहे. यातील
योगी व सामान्य भोगी यात फार अंतर आहे.
6.00 भोगी खाण्यासाठी जगतो तर योगी जगण्यासाठी खातो
भोग्याची दृष्टी नित्य कर्मफलावर असते तर
7.00 योगी स्वकर्मात निरपेक्ष बुद्धीने रत असतो.
ज्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जनसामान्य निजलेले
8.00 असतात म्हणजे अज्ञानी असतात तेथे स्थितप्रज्ञाला
उजाडलेले असते म्हणजे आत्मज्ञान झालेले असते.

म्हणुनि [illegible] अर्जुनाला ते [illegible]
म्हणुनि [illegible] नाम [illegible]
[illegible]
[illegible] स्वरूपी [illegible]

© www.madhaveeraghuveer.com

08 April Wednesday
Week 15
098-267

2009

| March | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 09 | 10 | 11 | 12 | 13 |
| Monday | 30 | 2 | 9 | 16 | 23 |
| Tuesday | 31 | 3 | 10 | 17 | 24 |
| Wednesday | | 4 | 11 | 18 | 25 |
| Thursday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Friday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Saturday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Sunday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |

| April | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| Monday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Tuesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Wednesday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Thursday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Friday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Saturday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Sunday | 5 | 12 | 19 | 26 | |

स्थितप्रज्ञाला विषय पाहूनही ते भोगण्याची इच्छा होत नाही त्याच्यासाठी सर्व जगच ब्रह्मरूपच झालेले असते. हे भगवंत समुद्राच्या उदाहरणाने सांगत आहेत.

(७०) संयमाचे पारमार्थिक फळ - जो संयमी स्थितप्रज्ञ असतो त्याचे चित्त ब्रह्मस्वरूपी लीन झाले म्हणजे त्याला बाह्य उपाधी यत्किंचितही बाधा करीत नाही. अशा स्थितीत त्याला नित्य शांतीचा अनुभव घडतो. येथे समुद्राचा दृष्टान्त दिला आहे.

समुद्रात चहूकडच्या नद्यांचे पाणी व पावसाचे पाणी एकसारखे पडत असतानाही तो सहसा आपली मर्यादा सोडत नाही. तसेच त्याच्या रंगात किंवा क्षारगुणात फरक पडत नाही.

समुद्र जसा स्थिर व गंभीर असतो तशीच स्थिती संयमी पुरुषाची असते.

याचप्रमाणे गगनाची उपमा आहे. क्रमाक्रमाने सहा ऋतूंचा पालट होत असतो तरी गगन निश्चल, निर्विकार असते. असाच स्थितप्रज्ञ असतो.

साधकाने ही सिद्धाची स्थिती प्राप्त करण्यासाठी काय करावे? त्याचे समाधान भगवंत करतात -

(७१) विषयत्यागानेच चिरशांतीचा अनुभव येतो.

साधकाने प्रथम सर्व कामनांचा म्हणजे विषयांचा त्याग केला पाहिजे. हे विषय तीन प्रकारचे आहेत.

१) बाह्यविषय - स्त्री, पुत्र, गृह, क्षेत्र, राज्य. इ०

२) अंतर्विषय - मनोराज्यादिक ३) वासनारूप विषय

© www.madhaveeraghukeer.com

9823050164



| May | | | | | | June | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Week | 18 | 19 | 20 | 21 | 22 | Week | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| Monday | | 4 | 11 | 18 | 25 | Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | | 5 | 12 | 19 | 26 | Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | | 6 | 13 | 20 | 27 | Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | |
| Thursday | | 7 | 14 | 21 | 28 | Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 1 | 8 | 15 | 22 | 29 | Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 2 | 9 | 16 | 23 | 30 | Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 3 | 10 | 17 | 24 | 31 | Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

अशा या त्रिविध विषयांचा परित्याग करून म्हणजे ते तुच्छ व मिथ्या मानून त्यांची उपेक्षा करून जो आपल्या शरीरा विषयी व जीवना विषयी मुळीच स्पृहा धरीत नाही त्याला शांतीचा चिरअनुभव येतो.

आत्मज्ञानाने तृप्त व परमानंदाने पुष्ट झालेल्याची स्थिरबुद्धी होते.

अशा प्रकारे सर्व कामनांचा, त्रिविध विषयांचा त्याग केल्यावर जी शांती लाभते तिलाच 'ब्राह्मीस्थिती' असे म्हणतात.

क्रमाक्रमाने अंतःकरणशुद्धी, सर्वकर्मसंन्यास करण्याची योग्यता, भगवद्भक्तीच्या ठायी दृढ निष्ठा, आणि नंतर ब्रह्मपदी स्थिरता प्राप्त होते. ही स्थिरता प्राप्त झाली म्हणजे त्रिगुणात्मक अविद्येचा निरास होऊन जीवन्मुक्तांची अवस्था प्राप्त होते. ही अवस्था प्राप्त झाल्यावर मानवाने परमपुरुषाचे अवलंबन करून निःसीम वैराग्य अंगी दृढ करावे.

या प्रकारे भगवंतांनी या अध्यायात काय टाकावे आणि काय धारण करावे याचे योग्य मार्गदर्शन केले आहे. (बीजरूपाने) एकदा या स्थितीला जाऊन पोहोचलेल्या स्थिरबुद्धी मानवाला ध्रुवासारखे अढळपद प्राप्त होते

स्थितप्रज्ञ म्हणजे संयमाची मूर्ती. म्हणजे बुद्धि आत्मनिष्ठ आणि अंतर्बाह्य इंद्रिये बुद्धीच्या हातात. स्थितप्रज्ञ सर्वेंद्रियांना लगाम घालून ती कर्मयोगात राबवतो. इंद्रियरूपी बैलांकडून तो निष्काम धर्माचरणाची शेती सुव्यवस्थित करून घेतो. त्याला प्रत्येक श्वासोच्छ्वास तो परमार्थामध्ये खर्च करत असतो.

© www.madhaveeraghuveer.com